मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंडे

■ वर्ष : ३ ■ अंक : १७५ ■ गुरुवार, ०५ मार्च २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाचे काम वेगात

**दैनिक युवक आधार**

**राजू शिंदे/महाराष्ट्र उप संपादक :** राज्यातील ऊसतोड कामगारांना विविध कल्याणकारी व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ मार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत असून कामकाजाला वेग आला आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक 13 सप्टेंबर 2019 च्या शासन निर्णयान्वये महामंडळाची स्थापना करण्यात आली. पुढे 24 फेब्रुवारी 2020 रोजीच्या शासन निर्णयानुसार ऊसतोड कामगारांशी संबंधित विषय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले. कंपनी कायदा 2013 अंतर्गत महामंडळाची नोंदणी पूर्ण करण्यात आली असून पुणे येथे 3 एप्रिल 2022 रोजी मुख्य कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

**ऊस गाळपावरून निधी संकलन**

सहकार विभागाच्या मान्यतेने साखर कारखान्यांकडून प्रति मेट्रिक टन ऊस गाळपावर रु.10 प्रमाणे निधी जमा करण्याचा शासन निर्णय 6 जानेवारी 2022 रोजी निर्गमित करण्यात आला. आतापर्यंत 173 साखर कारखान्यांकडून प्रति टन रु.3 प्रमाणे एकूण रु.38.32 कोटी निधी जमा करण्यात आला असून त्यासम प्रमाणात शासन स्तरावरून निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.


सन 2023-24 साठी रु.85 कोटी व सन 2025 साठी रु.50 कोटी अर्थसंकल्पित करण्यात आले असून आतापर्यंत 2023-24 साठी रु.5 कोटी व 2024-25 साठी रु.10 कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

**2.41 लाखांहून अधिक कामगारांची नोंदणी**

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली 10 सदस्यीय समिती गठित करण्यात आली असून ग्रामसेवकांमार्फत ओळखपत्र वितरणाची प्रक्रिया सुरू आहे. आतापर्यंत 2,41,532 ऊसतोड कामगारांची नोंदणी करण्यात आली असून 1,13,883 कामगारांना ओळखपत्र वितरीत करण्यात आले आहे.

**आरोग्य तपासणी व मोबाईल क्लिनिक**

राज्यातील 102 खाजगी व 109 सहकारी साखर कारखान्यांशी संलग्न 1,47,960 ऊसतोड कामगारांची हेल्थ कॅम्पद्वारे आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत मान्यताप्राप्त स्वयंसेवी



संस्थांच्या माध्यमातून मोबाईल क्लिनिक सुविधा सुरू करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

**संत भगवानबाबा शासकीय वसतीगृह योजना**

ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी दिनांक 15 जून 2021 रोजी संत भगवानबाबा शासकीय वसतीगृह योजना सुरू करण्यात आली आहे. बीड, जालना व अहमदनगर जिल्ह्यांत मुलांसाठी 41 व मुलींसाठी 41 अशी एकूण 82 वसतीगृहे मंजूर करण्यात आली आहेत. पहिल्या टप्प्यात 17 वसतीगृहे सुरू करण्यात आली असून 757 विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे.

**यांत्रिकीकरण व अनुदान योजना**

महामंडळाचे काम पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर ऊसतोड कामगारांना विद्युत संचलित कोयता, लहान ट्रॅक्टर व ट्रॉली पुरविण्याचा मानस आहे. तसेच बँकेकडून कर्ज घेऊन अवजारे खरेदी करणाऱ्या लाभार्थ्यांच्या कर्ज खात्यावर अनुदान जमा करण्याची योजना राबविण्यात येणार आहे.

**वेब व मोबाईल ॲप**

कामगार नोंदणीसाठी महाआयटी मार्फत वेब व मोबाईल ॲप विकसित करण्यात येत असून अंतिम टप्प्यात आहे.

**सानुग्रह अनुदान योजना**

दिनांक 10 ऑक्टोबर 2024 च्या शासन निर्णयानुसार अपघातात मृत्यू किंवा अपंगत्व आलेल्या ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यासाठी “गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजना” राबविण्यात येत आहे.राज्यातील लाखो ऊसतोड कामगार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी सामाजिक सुरक्षा, शिक्षण, आरोग्य व आर्थिक स्थैर्य देण्याच्या दिशेने महामंडळाचे कामकाज टप्प्याटप्प्याने पुढे सरकत असून भविष्यात अधिक व्यापक योजना राबविण्याचा शासनाचा मानस आहे.

# गाढेश्वर विभागातील जनजातीच्या मुलींना सायकलींचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** गाढेश्वर येथील पदाजी ठाकूर स्मृती भवनात गाढेश्वर विभागातील जनजातीच्या मुलींना सायकलींचे वाटप करण्यात आलं. हा उपक्रम रोटरी मिलेनियम सिटी वाशी यांच्या प्रयत्नातून आणि प्रेम शांती ट्रस्ट व वनवासी कल्याण आश्रम कुलाबा यांच्या प्रयत्नातून साकार झाला. या कार्यक्रमासाठी रोटी मिलेन सिटी वाशी याच्या अध्यक्ष अर्चना चोरारिया आणि प्रेमशांती विश्वस्त प्रेमचंद गोलिया आणि यशाची गोलिया




उपस्थित होते. तसेच वनवासी कल्याण आश्रम कुलाबा जिल्ह्याचे अध्यक्ष अविनाश म्हात्रे आणि महिला प्रमुख अनुराधा वाघमारे व आश्रमाचे जिल्हा कार्यकर्ते विष्णू सपरा हे उपस्थित होते. क्लबचे कार्यकर्ते युवराज आणि गाडेश्वर मधील ग्रामस्थ गुरुनाथ ढोमणे, नारायण भगत, गणपत भगत, किरण ढोबळे आणि दिगंबर भगत उपस्थित होते. कार्यक्रमात 15 जनजाती मुलींना सायकलीचं वाटप करण्यात आलं. त्यावेळी मुलींच्या चेहऱ्यावरील आनंद द्विगुणीत करण्यात आला. मुलींना शाळेत जाण्यासाठी सायकलच वापर उत्तम होईल असे प्रेमचंद गोलिया यांनी नमूद केले. तर अर्चना चोरारिया यांनी आपण या सायकलिंगचा सदुपयोग करावा आणि उत्तम शिक्षण घ्यावे असे नमूद केले. शेवटी वनवासी कल्याण आश्रमाचे अध्यक्ष अविनाश म्हात्रे यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या व सायकली उत्तम प्रकारे वापरून आपण जो वेळ वाचेल तो अभ्यासासाठी सत्कारणी लावावा असा आशावाद व्यक्त केला. शेवटी उपस्थित आमचे आभार मानून विष्णुसप्रा यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

# थेपडे विद्यालय म्हसावद येथे राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**जळगाव जिल्हा प्रतिनिधी/समाधान पाटील :** म्हसावद येथे स्वा. सै. पं. ध. थेपडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. 'मानवता हीच खरी ईश्वर सेवा' हा संदेश देणाऱ्या या थोर संताच्या विचारांचा जागर याप्रसंगी करण्यात आला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे प्राचार्य श्री. जी. डी. बच्छाव, उपप्राचार्य श्री. एस. के. भंगाळे आणि पर्यवेक्षक श्री. के. पी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य श्री. जी. डी. बच्छाव यांनी गाडगे महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, "गाडगे बाबांनी स्वच्छतेतून भक्तीचा मार्ग दाखवला. त्यांचे विचार केवळ



ऐकण्यासाठी नसून ते आचरणात आणणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल." विद्यार्थ्यांनी महाराजांचा सेवाभाव आणि समाजसुधारणेचा वारसा जोपासावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.या प्रसंगी ज्येष्ठ शिक्षक श्री. एस. एम. नेतकर, श्री. एस. सी. बाविस्कर, श्री. एन. के. अहिरे, श्री. एस. जे. पवार आणि ज्येष्ठ शिक्षिका सौ. अनिता नेवे मॅडम यांच्यासह विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन श्री. पी. पी. मगरे यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकवृंदाने सहकार्य केले.




# वाहतूक पोलीस वाहन सुरक्षा अभियान 2026, भावना ग्रुपच्या साथीने संपन्न



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** वाहतूक पोलीस वाहन सुरक्षा अभियान 2026 हे भावना ग्रुपच्या साथीने नवी मुंबईत संपन्न झालेदरवर्षीप्रमाणे याही वर्षी वाहतूक सुरक्षा व वाहतुकीचे नियम हे ठीक ठिकाणी जाऊन सांगण्याचा समजावण्याचा मार्गदर्शन करण्याचा हेतू घेऊन नवी मुंबई पोलिसांनी भावना ग्रुप नवी मुंबई याची साथ घेतली. भावना ग्रुप नवी मुंबई आणि खा खेळा वाचा अभियान मालक राजेश शहा आणि मालक अपर्णा शहा यांच्या मार्गदर्शनाने त्यांच्या कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांना निपुण अशी माहिती देऊन वाहतुकीचा संदेश नियम आणि सुरक्षा पोलिसांसोबत कर्मचाऱ्यांनीही हा संदेश दिला.

नवी मुंबईतील अनेक शाळांमध्ये अनेक कंपन्यांमध्ये जाऊन भावना ग्रुपच्या कर्मचाऱ्यांनी आणि पोलिसांनी समाजाला पुनश्च एकदा वाहतूक सुरक्षेची आणि वाहतूक नियमांची जाणीव आणि ओळख करून दिली. जेणेकरून वाहतुकीचे नियम अमलात आणणे ही आपली सवय बनावी जेणेकरून अपघाताचे वाढत चाललेले प्रमाण आटोक्यात यावे आणि यासाठी यावर्षी वाहतूक पोलिसांनी ब्रीदवाक्य देखील बनवलं ," रोड सुरक्षा, हीच जीवन रक्षा".



पाटोदा - लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांचे मंत्रालयीन कामकाज पाहणारे स्विय सहाय्यक ॲड.सुशील ढोले यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना. पाटोदा पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे, सचिव तथा माध्यम प्रमुख ॲड.महेश बेदरे, ज्येष्ठ पत्रकार अजीज शेख, पत्रकार महेशर शेख, पत्रकार सतिश गर्जे, प्रेस फोटोग्राफर राहुल सोनवणे, प्रेस फोटोग्राफर सखाराम भोसले, यांच्या सह पाटोदा तालुका पत्रकार संघाचे पदाधिकारी...

(छाया - दैनिक युवक आधार पाटोदा.)

# मध्य रेल्वे द्वारे प्रवाशांच्या सेवेसाठी 862 होळी विशेष गाड्या चालवल्या

## ४ दिवसांत २४.१८ लाख प्रवाशांनी प्रवास केला

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू /संपादक नागपूर विभाग :** मध्य रेल्वे द्वारे आपल्या प्रवाशांना त्यांच्या जवळच्या आणि प्रियजनांसोबत होळी साजरी करण्यासाठी नियमित गाड्यांव्यतिरिक्त ८६२ होळी विशेष गाड्या चालवल्या आहेत.

या विशेष गाड्यांमध्ये पूर्णपणे वातानुकूलित विशेष गाड्या, अनारक्षित विशेष गाड्या आणि देशभरातील विविध लोकप्रिय ठिकाणांसाठी वातानुकूलित, शयनयान आणि सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे असलेल्या इतर गाड्यांचा समावेश आहे.

या गाड्यांमध्ये मध्य रेल्वेने चालवलेल्या ६७० होळी विशेष गाड्यांचा समावेश आहे ज्यामध्ये १०५.०६% प्रवासी ऑक्युपन्सी होती.

मध्य रेल्वेने विविध राज्यांसाठी खालीलप्रमाणे होळी विशेष गाड्या चालवल्या आहेत:

- महाराष्ट्रात राज्यांतर्गत प्रवासासाठी ४०९ गाड्या.
- उत्तर प्रदेशासाठी १४२ गाड्या.
- बिहारसाठी ८२ गाड्या.
- गोव्यासाठी २१ गाड्या.

होळी पूर्वी ४ दिवसांत (२७.२.२०२६ ते ०२.०३.२०२६ पर्यंत) मध्य रेल्वेच्या नियमित आणि विशेष गाड्यांमधून (होळीच्या विशेष गाड्यांसह) २४.१८ लाख प्रवाशांनी प्रवास केला आहे. यामध्ये मुंबईहून ७ लाख प्रवाशांचा समावेश आहे

देशभरातील प्रमुख ठिकाणांना जोडण्यासाठी या विशेष गाड्यांचे काटेकोरपणे नियोजन केले आहे, ज्यामुळे वरील राज्यांमध्ये होळी सणाच्या गर्दीला तोंड देता आले.

अतिरिक्त गाड्यांचे नियोजन आणि चालवणे ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे ज्यासाठी मीडिया रिपोर्ट्स, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, रेल्वे इंटिग्रेटेड हेल्पलाइन नंबर १३९ यासारख्या सर्व माध्यमांकडून २४x७ माहिती घेतली जाते, तसेच पीआरएस सिस्टममधील प्रतीक्षा यादीतील प्रवाशांची माहिती देखील घेतली जाते. जेणेकरून विशिष्ट मार्गावरील गाड्यांची मागणी तपासता येईल. या आवश्यकतेनुसार, गाड्यांची संख्या आणि फेऱ्यांची संख्या वाढवली जाते.

चालू उत्सवाच्या काळात प्रवाशांच्या वाढत्या मागणीला पूर्ण करण्यासाठी मध्य रेल्वेने व्यापक व्यवस्था केली आहे.

**यामध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे:**

* प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी), लोकमान्य टिळक टर्मिनस (एलटीटी), पुणे इत्यादी प्रमुख स्थानकांवर होल्डिंग एरियाची व्यवस्था.

* कव्हर्ड शेड, पुरेसा प्रकाश, व्हेंटिलेशन, पिण्याचे पाणी, पंखे, शौचालये, चार्जिंग पॉइंट्स, फूड स्टॉल्स आणि प्रवाशांच्या ॲड्रेस सिस्टिमची व्यवस्था करण्यात आली आहे.

* प्रमुख स्थानकांवर तिकीट तपासणी कर्मचारी आणि आरपीएफ कर्मचाऱ्यांच्या पथकासह प्रभावी गर्दी व्यवस्थापन.

* प्रवाशांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी अनेक स्थानकांवर मदत कक्षांची व्यवस्था.

* छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे मोबाईल यूटीएस सहाय्यकांची व्यवस्था.

* गाड्यांच्या वेळा आणि इतर महत्वाच्या माहितीबाबत नियमित घोषणा केल्या जात आहेत.

* आरपीएफ कर्मचारी आणि वाणिज्यिक कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली प्रवाशांना चढण्यासाठी रांगेत उभे राहण्याची खात्री केली जात आहे.

* एआय आणि वॉर रूमच्या मदतीने तिकिटांची उपलब्धता आणि प्रवाशांच्या ट्रेंडचे रिअल-टाइम निरीक्षण केले जात आहे.

* प्रमुख स्थानकांवर सुरक्षिततेसाठी आरपीएफ आणि जीआरपीशी समन्वय राखला जात आहे.

• प्रसिद्धी पत्रक आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे माध्यमांना आणि जनतेला माहिती देऊन होळी विशेष गाड्यांची व्यापक प्रसिद्धी.

कार्यक्षम व्यवस्था, सुधारित प्रवासी सेवा आणि सुविधा आणि काळजीची वचनबद्धता यासह, मध्य रेल्वे उत्सवाच्या काळात प्रत्येक प्रवाशाला त्याच्या रेल्वे प्रवासादरम्यान चांगली सेवा मिळावी याची खात्री करत आहे. मध्य रेल्वे आपल्या सर्व आदरणीय प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी आणि सोयीस्कर प्रवास अनुभव देण्यासाठी वचनबद्ध आहे.

# चार लाख 64 हजारांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** गॅस कनेक्शनच्या महिन्याचे बिल अपडेट करण्यास सांगून चार लाख 64 हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. भूपेंदर कौर मोहिंदर सिंग या खारघर, सेक्टर 20 येथे राहत असून त्यांना महानगर गॅस लिमिटेड संबंधी मोबाईलवर मेसेज आला आणि गॅस कनेक्शन डिस्कनेक्ट होणार असल्याचे सांगून महिन्याचे बिल अपडेट करण्यास सांगितले. त्यावेळी त्यांनी बिल भरले असल्याबाबतचा मेसेज समोरच्या मोबाईलवर पाठवला. त्यानंतर मी वरिष्ठ अधिकारी बोलत असल्याचे सांगून ते त्यांच्यासोबत व्हाट्सअप कॉलवर बोलू लागले आणि मोबाईलवर क्लिक करत गेले. आणि मोबाईलची पूर्ण स्क्रीन त्यांना शेअर झाली. आणि त्यांच्या बँकेतून चार लाख 64 हजार रुपये वळते करण्यात आले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच गुन्हा दाखल करण्यात आला.

# पनवेल तालुका पत्रकार मंचाने सन्मान केल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे - लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** नुकत्याच पार पडलेल्या पनवेल महानगरपालिका तसेच रायगड जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टीने लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली दैदिप्यमान यश प्राप्त केले. लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या धोरणी आणि सर्वसमावेशक राजकारणामुळे भारतीय जनता पार्टीचा सर्वत्र डंका वाजत आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर हे करत असलेल्या लोकाभिमुख समाजकारणाला जनता जनार्दनाने दिलेली ही एक प्रकारे सर्वमान्यता आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना प्रशस्तीपत्रक प्रदान करून त्यांचा सन्मान केला.



पनवेल महानगरपालिकेची दुसरी निवडणूक नुकतीच पार पडली. ७८ नगरसेवकांपैकी ६० नगरसेवक भारतीय जनता पार्टीचे निवडून आलेले आहेत. अत्यंत सजग व प्रामाणिक कार्यप्रणाली असणारे नितीन भाई पाटील हे महापौर पदी विराजमान झालेले आहेत. तर नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत पनवेल तालुक्यातील आठ पैकी आठही मतदारसंघांवर भारतीय जनता पार्टीचा झेंडा फडकला आहे. पनवेल पंचायत समिती मधील १६ मतदारसंघांपैकी १५ मतदारसंघांमध्ये भारतीय जनता पार्टीने एक हाती विजय संपादित केला. या दैदीप्यमान यशाचे श्रेय माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनाच जाते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कुशल नेतृत्वाखाली सारे डावपेच आखले गेले होते. एखाद्या कसलेल्या राजकीय धुरंधराप्रमाणे त्यांनी टाकलेल्या डावपेचात महाविकास आघाडीची अक्षरशः धूळधाण उडाली. पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाने त्यांच्या याच कर्तृत्वाबद्दल त्यांना शाल श्रीफळ व सन्मानपत्र देऊन त्यांचा सत्कार केला. या सन्मानाला उत्तर देताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की माझ्या मार्गदर्शनाखाली या निवडणुका आम्ही लढवल्या आणि जिंकल्या असे असले तरी देखील जनता जनार्दनाने आम्ही केलेल्या पाच वर्षाच्या विकास कामांकडे पाहून आम्हाला विजयी केलेले आहे. आम्ही सातत्याने सकारात्मक आणि जनता केंद्रित राजकारण करत आलो आहोत. लोकांच्या समस्यांचे तातडीने निराकरण करून त्यांना सुविधांचा जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्याकडे आमच्या कार्यकर्त्यांचा कल असतो. सर्व नवनिर्वाचित याच भूमिकेतून काम करतील याची मला खात्री आहे. पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाने मला सन्मानित केले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. या सत्कार सोहळ्याला माजी सभागृह नेते परेशशेठ ठाकूर, अध्यक्ष राजेंद्र पाटील, सल्लागार संजय कदम, सल्लागार मंदार दोंदे, खजिनदार दत्ता कुलकर्णी, सरचिटणीस हरेश साठे, सदस्य राजू गाडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# प्रियदर्शिनी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** प्रियदर्शिनी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये आज दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी थोर समाजसुधारिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.सर्वप्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण व पूजन करून जयंती उत्सव साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे व्हा. चेअरमन इम्रान शेख सर तसेच प्राचार्य श्री .सुधीर भिसे सर उपस्थित होते.प्राचार्य सुधीर भिसे सर यांनी शिक्षणाने मोठे होऊन स्वरक्षणासाठी सज्ज रहा असे सांगितले.याप्रसंगी कु.मेहजबीन शेख व कु.आराध्या माने या विद्यार्थिनींनी समाजसुधारक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्य संवर्धावर प्रकाश टाकला. तसेच शाळेतील सहशिक्षिका सौ.रझिया शेख मॅडम यांनी शिक्षणाचे महत्त्व व सावित्रीबाईंनी केलेला संघर्ष यावर मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आठवीच्या विद्यार्थिनी कु.जान्हवी गवळी व कु.कृष्णाली खामगळ यांनी केले तर आभार कु.विराली ठवरे या विद्यार्थिनीने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# भोई प्रतिष्ठानच्या 'रंग बरसे' रंगमहोत्सवात वंचित बालमित्रांचा उत्स्फूर्त सहभाग

## अर्धापूर येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांनी लुटला रंगोत्सवाचा आनंद

**दैनिक युवक आधार**

**अर्धापूर, तालुका प्रतिनिधी – अरविंद पांचाळ :** तालुक्यातील आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांनी भोई प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'रंग बरसे' रंगोत्सवात सहभागी होत रंगपंचमी मोठ्या उत्साहात साजरी केली.

रंगांची मुक्त उधळण, पाण्याचे फवारे आणि गाण्यांच्या तालावर नृत्य करत विद्यार्थ्यांनी आनंदोत्सव अनुभवला.

पुण्यातील भोई प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी समाजातील वंचित घटक आणि विशेष मुलांसाठी 'रंग बरसे' या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. यंदा या रंगोत्सवाचे ३१ वे वर्ष होते.

"रंग बरसे भीगे चुनरवाली…", "खंडेरायाच्या लग्नाला…", "ब्राझील…", "सैराट…" अशा लोकप्रिय गाण्यांच्या तालावर विशेष मुले अक्षरशः रंगून गेली होती. नैसर्गिक व पर्यावरणपूरक रंगांची उधळण, पाण्याचे फवारे आणि विविध मान्यवरांसोबत नृत्य यामुळे वातावरण आनंदमय झाले होते.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विशेष मुले, अंध व मूकबधिर विद्यार्थी,



आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुले, रेल्वे प्लॅटफॉर्मवर बूट पॉलिश करणारी मुले, डोंबारी खेळ करणारी मुले, देवदासी भगिनींची मुले तसेच ऊसतोड कामगारांची मुले अशा विविध घटकांतील सुमारे अडीच हजार बालमित्रांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

मुलांच्या स्वागतासाठी पर्यावरणपूरक रंग, पोलीस बँड, पिचकारी, नाश्ता व स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. त्यांच्या आवडीच्या गाण्यांवर नृत्य करताना आणि पाण्याच्या फवाऱ्यांमध्ये भिजताना मुले हरखून गेली होती.

या रंगमहोत्सवाला खा. डॉ. मेधा कुलकर्णी, महापौर मंजुषा नागपूरे, उपमहापौर परशुराम वाडेकर तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर उपस्थित होते. विविध पक्षांचे नगरसेवक, लोकप्रतिनिधी व पोलीस अधिकारीही यावेळी उपस्थित होते. 'पुण्य जागर' प्रकल्पाचे समन्वयक लक्ष्मीकांत मुळे, गुणवंत वीरकर, अरविंद पांचाळ, सखाराम क्षीरसागर , संदिप राऊत, आनंद मोरे आदींनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे संयोजक व भोई प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. डॉ. मिलिंद भोई यांनी प्रास्ताविकात सांगितले की, "विशेष मुलांच्या आयुष्यात आनंद, उत्साह आणि मांगल्याचे रंग भरावेत, या हेतूने हा उपक्रम सातत्याने राबवला जात आहे," असे त्यांनी नमूद केले.

या रंगोत्सवात नेक्स्ट जेन मूकबधिर संस्था, ज्ञान गंगोत्री मतिमंद संस्था, अस्तित्व गुरुकुल, समर्पण संस्था, एनेबलर फाउंडेशन, बचपन वर्ल्ड फोरम, वंचित विकास, वाघमोडे प्रतिष्ठान, अलका फाउंडेशन, अक्षर स्पर्श, जिजाऊ फाउंडेशन, कसबा संस्कार केंद्र, पर्वती दर्शन बालसंस्कार केंद्र, सूर्योदय सोशल फाउंडेशन, आयडेंटिटी फाउंडेशन, स्वाधार संस्था, श्री संत गजानन महाराज शिक्षण संस्था, अनिकेत सेवाभावी संस्था आदी संस्थांतील बालगोपाळांनी सहभाग घेत धुलीवंदनाचा आनंद लुटला.

# श्रीवर्धनमध्ये होळी व धुलीवंदन उत्सव उत्साहात; ग्रामदैवतांची अनोखी भेट भाविकांना भावली

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी / अनिकेत मोहित :** कोकणातील सांस्कृतिक परंपरेचे जतन करणाऱ्या श्रीवर्धन शहरात यंदाचा होळी व धुलीवंदन उत्सव अत्यंत उत्साह, भक्तिभाव आणि पारंपरिक थाटात साजरा करण्यात आला. मानाच्या होळ्यांना प्रारंभ होताच संपूर्ण शहर होळीमय वातावरणात न्हाऊन निघाले.

प्रथम मानाच्या होळ्या म्हणून सोमजाई मंदिर, भैरवनाथ मंदिर, कुसुमादेवी मंदिर आणि काळश्री मंदिर येथे पारंपरिक विधीपूर्वक होळ्या प्रज्वलित करण्यात आल्या. या मानाच्या होळ्यांनंतर शहरातील विविध विभागांत होळी लावण्याची परंपरा पार पडली.

होलिका दहनावेळी भाविकांनी नवसाची ओटी व साडी अर्पण करून होलिका मातेला वंदन केले. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत श्रद्धाभावाने पूजन केले. ढोल-ताशांच्या गजरात आणि जयघोषात वातावरण भारावून गेले होते. लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनी उत्सवात सहभाग घेत परंपरेचा वारसा जपला.

धुलीवंदनाच्या दिवशी श्रीवर्धनमध्ये ग्रामदैवतांची अनोखी व भावस्पर्शी भेट



पार पडली. लोकपरंपरेनुसार कुसुमादेवी व सोमजाई या बहिणी, तर भैरवनाथ हे त्यांचे भाऊ मानले जातात. शिमगा उत्सवाच्या प्रारंभापासूनच या तिन्ही देवतांच्या मानाच्या होळ्या लावण्याची प्रथा आहे.

धुलीवंदनाच्या दिवशी करमरकर नाका येथे या तिन्ही बहीण-भावांची पारंपरिक भेट घडते. मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहून देवींची ओटी भरतात व दर्शन घेतात. भक्तिमय वातावरणात ढोल-ताशांच्या गजरात हा सोहळा रंगतो.

यानंतर सर्व देवतांची मिरवणूक सोमजाई मंदिराच्या दिशेने मार्गस्थ होते. मार्गात बाजारपेठेतील काळश्रीदेवी मंदिर येथेही पारंपरिक भेट होते. अखेरीस जुने तहसील कार्यालयाच्या पटांगणात सोहळ्याची सांगता होते. गुलालाच्या उधळणीने शहर भक्तिरंगात न्हाऊन निघते.वर्षानुवर्षे चालत आलेली ही परंपरा आजही तितक्याच श्रद्धेने पाळली जात असून धार्मिक एकात्मता, सामाजिक सलोखा आणि सांस्कृतिक जतन यांचे सुंदर दर्शन या उत्सवातून घडते. श्रीवर्धनकरांनी पुन्हा एकदा एकजुटीने सण साजरा करत परंपरेचा मान राखल्याचे या उत्सवातून अधोरेखित झाले.

## सामाजिक न्याय विभागाच्या विविध पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई/ नवी मुंबई :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत समाज कल्याण क्षेत्रात वैशिष्टपूर्ण कार्य करणाऱ्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था व उल्लेखनीय कार्य करणारे समाजसेवक/ व्यक्ती यांना दरवर्षी विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. सन 2024-25 व 2025-26 या आर्थिक वर्षात देण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार, पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कार, शाहु, फुले, आंबेडकर पारितोषिक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्रावीण्य पुरस्कार या विविध पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. वरीलपैकी ज्या वर्षासाठी व ज्या पुरस्काराकरीता अर्ज करण्यात येत आहे, त्या वर्षासाठी त्या पुरस्काराकरीता विहित केलेल्या अटीची पुर्तता करणे आवश्यक राहील. समाज कल्याण क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या इच्छुक स्वयंसेवी संस्था व व्यक्ती यांनी सदर पुरस्कारासाठी दि.15/03/2026 पर्यंत अर्ज नमूद करण्यात आलेल्या कागदपत्रासह संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडे सादर करावे असे आवाहन डॉ. हर्षदिप कांबळे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई, श्रीमती दिपा मुधोळ-मुंडे, आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य पुणे व श्री. बाळासाहेब सोळंकी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग मुंबई यांनी केले आहे.

सदर पुरस्काराकरीता अर्जाचा नमूना समाजकल्याण विभागाच्या मुंबई शहर, उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचे कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

तसेच पुरस्काराची जाहिरात व अर्जाचा नमुना शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या https://sjsa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधावा.

# नागपूर पोलिसांची उत्कृष्ट कामगिरी हरवलेले 82 मोबाईल नागरिकांना परत

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/ विदर्भ संपादिका** : होळी व धुलिवंदन सणाच्या पार्श्वभूमीवर नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत परिमंडळ क्र. ४ च्या वतीने हरवलेले मोबाईल शोधून नागरिकांना परत देण्याचा उपक्रम व कार्यक्रम राबविण्यात आला. या मोहिमेत एकूण ८२ मोबाईल फोन नागरिकांना परत करण्यात आले असून त्यांची अंदाजे किंमत सुमारे १२ लाख ३० हजार रुपये इतकी आहे.



पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र. ४ रश्मिता राव (भा.पो.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर सेल व संबंधित पोलीस ठाण्यांच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे हरवलेले मोबाईल शोधून काढले. महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, बिहार, तेलंगणा, मध्यप्रदेश आदी राज्यांमधून हे मोबाईल हस्तगत करण्यात आले. हरवलेले मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी नागपूर पोलिसांचे आभार व्यक्त केले. मोबाईल हरवल्यास नागरिकांनी त्वरित पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवून केंद्र शासनाच्या CEIR पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रम सायबर सेलचे अधिकारी माननीय पोलीस उपायुक्त रश्मिता राव एन यांचे मार्गदर्शनात सपोआ सक्करदरा विभाग श्री प्रदीप शिरस्कर, सपो आ अजनी विभाग श्री नरेंद्र हिवरे, तसेच संबंधित प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे नंदनवन श्री कैलास दशमाने, सक्करदरा श्री प्रमोद पोरे, इमान वाडा श्री जयवंत पाटील, बेलतारोडी श्री मुकुंद कवाडे, हुडकेश्वर श्री हृदयनाथ यादव यांचे सहयोगाने पार पाडण्यात आला सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस उपनिरीक्षक श्री शिंदे सर यांनी केले व सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री प्रशांत साबळे यांनी उपस्थित आमचे आभार मानले सदर उपक्रमात पथकाने विशेष परिश्रम घेतले.

## संध्या राजूरकर संध्या राजुरकर यांना 'नीता दिलीप मून' स्मृति पुरस्कार

**दैनिक युवक आधार**

**डॉ सुनिल भगत/ प्रतिनिधि,नागपूर ( दक्षिण)** : सामाजिक क्षेत्रात सक्रिय कार्य करणाऱ्या नागपूर जिल्ह्यातील दैनिक बहुजन सौरभच्या निवासी संपादक प्रा. संध्या राजुरकर आणि सामाजिक, धार्मिक क्षेत्रात सक्रिय योगदान देणाऱ्या उषा बौद्ध यांना 'स्मृतीशेष नीता दिलीप मून' हा रोख रक्कम सह सन्मान पुरष्कार घोषित करण्यात आला आहे. हा पुरष्कार 8 मार्च 2026 रोजी महिला दिनाचे औचित्य साधून आणि स्मृतीशेष नीता दिलीप मून यांच्या वाढदिवसानिमित्त प्रदान केला जाणार आहे.



संध्या राजुरकर ह्या दैनिक बहुजन सौरभच्या निवासी संपादक आहेत. बहुजन सौरभ या दैनिक वृत्तपत्राच्या माध्यमातून बुद्ध फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांचा सतत प्रचार-प्रसार करण्याचे कार्य त्या करत आहेत. बहुजन सौरभ मुळे घराघरात वाचन संस्कृती जोपासली जात आहे. या प्रकारे महामानवांचे तत्वज्ञान रुजवण्याचे कार्य संपादक प्रा. संध्या राजूरकर जबाबदारीने पार पाडत आहेत. रोजच्या संपादकीय लेखातून त्यांच्या निर्भिड आणि धाडशी विचाराची जाणीव होते. बालपणी डॉ. आंबेडकरांचे पुस्तके वाचून ते विचार डोक्यात घेऊन आंबेडकरी विचाराने अधिक प्रगल्भ होत गेल्या. अपर्याप्त संसाधने आणि वेळोवेळी येणाऱ्या संकटांचा सामना करत दैनिक वृत्तपत्र चालवणे किती जिकरीचे आहे, हे 'जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे!' पत्रकारितेच्या क्षेत्रात नावलौकिक प्राप्त असलेल्या संध्या राजुरकर यांच्या खडतर परिश्रम व निष्ठेला मिळालेला हा सन्मान आहे.

धार्मिक, सामाजिक क्षेत्रात अग्रस्थानी असलेले दुसरे नाव उषा बौद्ध आहे .समाजगटात आंबेडकरी विचारांची, संवैधानिक मूल्यांची पेरणी करणारे व्यक्तीमत्व असून खैरलांजी, अंबाझरी आंदोलन, महिलांचे सक्षमिकरण, कोरोना काळात झोपडपट्टीत जाऊन केलेले कार्य, अंधश्रद्धा, कुप्रथा दूर करण्यासाठी सातत्याने केलेले कार्य अशा विविध कार्यातून उपा बौद्ध यांची कर्तव्यनिष्ठा दिसून येते. आजही त्या पारिवारीक धम्मसंगोष्टीच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदावर कार्यरत आहेत. माता रमाई, जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्रावर आधारित एकपात्री नाटकातून समाजप्रबोधन करण्याचे त्यांचे कार्य विसरता येणे नाही कर बदल घालूनी घाव हा त्यांचा नाट्यप्रयोग अतिशय गाजलेला आहे. अशा बहुआयामी व्यक्तिमत्व असणाऱ्या प्रा. संध्या राजुरकर आणि उषा बौद्ध यांच्या मोलाच्या कार्याची दखल प्रभावती वैद्य इंस्टीट्यूट ऑफ नॉलेज अँड एम्पावरमेंट नासिकचे अध्यक्ष माजी न्यायाधीश आणि सुप्रसिद्ध लेखक अनिल वैद्य आणि संस्थेच्या सचिव ॲड. रेखा धुळधूळे यांनी सामाजिक कार्यात सहभागी असलेल्या महिलांच्या सन्मानार्थ 'स्मृतीशेष नीता दिलीप मून' हा पुरस्कार घोषित केला आहे. या पुरस्काराचे प्रायोजक दिलीप मून, सेवानिवृत्त बँक अधिकारी नागपूर हे आहेत. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नागपूर,

वंदना संघ दीक्षाभूमी, धम्मसंगोष्टी मनीषनगर, सम्यक संकल्प संघ, महिला सशक्तीकरण संघ, राष्ट्रीय पारिवारीक धम्म सांगोष्टी, बहुजन मैत्री संघ, नरेंद्रनगर, आविष्कार संगीत अकादमी , या सर्व संघटनांतर्फे तसेच दैनिक बहुजन सौरभ आणि दैनिक युवक आधार परिवाराने संध्या राजुरकर आणि उषा बौद्ध यांचे अभिनंदन केले

आहे. दैनिक बहुजन सौरभ संपादक डॉ सिद्धार्थ कांबळे , अनिल भगत, विलास गजभिये यांनी कौतुक केले आहे.महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नागपूर चे पदाधिकारी डॉ सुनिल भगत, देवयानी भगत, रामभाऊ डोंगरे, गौतम पाटील, शोभा पाटील आणि इतर सर्वांनी अभिनंदन केले आहे.

## स्कुटीची ट्रेलरला धडक, दोघांचा मृत्यू



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** ट्रेलरला स्कुटीने धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली.28 फेब्रुवारी रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास असद मेनन समशद (वय 19 राहणार सेक्टर 20 सीवूड) आणि मुस्कान संजय सिंग (वय 20 राहणार ट्रॅक्टर 20 नेरूळ पूर्व) हे स्कुटी क्रमांक एम एच 03 ईसी 7641 ने पुण्याकडून पनवेल कडे जात होते. स्कुटीने जुना मुंबई पुणे हायवे पनवेल लेनवर कोन बीट पोलीस चौकी समोर अशोक लेलँड कंपनीचा ट्रेलर क्रमांक एम एच 43 यु 6566 ला समोरून उजव्या बाजूने ठोकर मारली. या अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले आणि दोघांचाही मृत्यू झाला.

## येवदा येथे भव्य हिंदू सम्मेलनाचा समारोप

### बाईक रॅलीने सुरुवात , शेकडो तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे/तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : दर्यापूर तालुक्यातील येवदा मध्ये आयोजित भव्य हिंदू संमेलन 1 मार्च 2026 रोजी पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात भवानी माता मंदिर येथून भव्य बाईक रॅली निघाली ती संपूर्ण गावात फिरली व श्री संत गजानन महाराज ऋषी वाडी येथे संपली. मोठ्या संख्येने तरुण आणि ग्रामस्थ भगवे झेंडे घेऊन उत्साहाने सहभागी झाले. हिंदू सममेलनाची सुरुवात संत गजानन महाराज मंदिराच्या प्रांगणात झाली. सुरुवावातीस गो पूजन व भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून झाले.संमेलनाच्या सुरुवातीस सामूहिक हनुमान चालीसा व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या वेळी भारत माता , श्रीराम , लक्षमन , भरत , लक्षमन



यांच्या झाकया तयार करून या वेशभूशेमुळे अनेकांचे लक्षं वेधले. या नंतर मार्गदर्शक सत्रचे आयोजन केले गेले यात मुख्य वक्ते इशांतजी गीद यांनी त्यांच्या उद्बोधंनातून समाजात एकता कशी निर्माण होईल या विषयावर प्रकाश टाकण्याचे काम केले प्रमुख अतिथी म्हणून महंत शिवानंद जी पुरी महाराज सचिव श्री पंच जुना आखाडा त्रंबकेश्वर यांनीही आपले संबोधन हिंदू धर्म त्याची परंपरा संस्कृती आणि मुल तत्वावर प्रकाश टाकला यात समाज मध्ये एकता व जागरूकता चा संदेश दिला हिंदू धर्म संस्कृती त्यांच्या मूल तत्वावर भाष्य करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. सोबत वर्षाताई उफाळे यांनी नारी शक्ति त्याचे सामर्थ विध्याताई मूरहेकर यांनी विद्यार्थी जीवन त्यांचे कर्तव्य जबाबदारी यावर उत्साहवर्धक मार्गदर्शन केले. सोबत हितेश शृंगारे व अजिंक्य धर्माधिकारी यांच्या भाषणाने तर श्रोते आवक राहिले त्यांच्या भाषनाणे तरुणांमध्ये राष्ट्रचेतना जागृत करण्याचा भाव चेहऱ्यावर दिसत होता. संमेलनामध्ये मोठ्या संख्येने ग्रामस्थ महिला पुरुष व युवा उपस्थित होते कार्यक्रमाची समाप्ती सामूहिक ध्येय मंत्र व प्रसाद वाटपाने सांगता करण्यात आली

## आमदार किसनरावजी वानखेडे यांनी महागाव नगरपंचायत कार्यालय येथे नवनिर्वाचित अध्यक्षा सौ. रंजना दीपक आडे यांचा सत्कार करण्यात आला

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे/महागाव (यवतमाळ)** : आमदार किसनरावजी वानखेडे यांनी महागाव नगरपंचायत कार्यालय येथे नवनिर्वाचित अध्यक्षा सौ. रंजना दीपक आडे यांचा सत्कार करून महागाव शहराच्या विकासासाठी आवश्यक त्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

महागाव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नगरपंचायतीला निधीची कोणतीही कमतरता भासू




दिली जाणार नाही, असे स्पष्ट करत आमदार वानखेडे म्हणाले की, "महागाव शहर सुंदर, सुजलाम-सुफलाम आणि आदर्श शहर बनवण्यासाठी आमदार म्हणून मी आवश्यक ती सर्वतोपरी मदत करण्यास कटिबद्ध आहे."यावेळी नेते रामरावजी पाटील नरवाडे, उपाध्यक्ष प्रमोद उर्फ शाखा भरवाडे, सुरेश पाटील नरवाडे भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष निलेश पाटील नरवाडे, दीपक मामा आडे, नारायण शिरबिरे जयश्री नरवाडे , सुभाषराव नरवाडे, विशाल पांडे, परवेज सुरैया, जयश्री इंगोले, शिवाजीराव डाखोरे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी नव्या नेतृत्वाला शुभेच्छा देत महागाव शहराच्या प्रगतीसाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# अन्यायाला थेट ललकारणारा जिल्ह्याचा बुलंद आवाज!

## जनतेसाठी रस्त्यावर उतरणारे तडफदार नेतृत्व – अर्जुन (मामाश्री)पाटील खरात !

**रिसोड (वाशिम) :** काही माणसं पदामुळे मोठी होत नाहीत… तर त्यांच्या धाडसामुळे, त्यांच्या जिद्दीमुळे आणि त्यांच्या संघर्षामुळे मोठी ठरतात. वाशिम जिल्ह्यात असंच एक नाव लोकांच्या मनात ठामपणे कोरलं गेलं आहे — अर्जुन पाटील खरात मामाश्री.

गेल्या अनेक वर्षांपासून संभाजी ब्रिगेड चे वाशिम जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत असलेले अर्जुन पाटील खरात (मामाश्री)हे फक्त संघटनेचे पदाधिकारी नाहीत, तर ते जनतेच्या आशेचा किरण आहेत. अन्याय झाला, शेतकऱ्यांवर अन्याय झाला, सामान्य माणूस प्रशासनाच्या दारात हेलपाटे खात उभा राहिला — की रस्त्यावर पहिला आवाज उठतो तो अर्जुन पाटील खरात (मामाश्री)यांचा.

राजकीय पार्श्वभूमी नसताना, कोणत्याही मोठ्या पाठबळाशिवाय स्वतःच्या हिमतीवर उभं



राहिलेलं हे नेतृत्व आज जिल्ह्यात एक वेगळी ताकद बनलं आहे. आंदोलने, मोर्चे, निवेदने, संघर्ष… आणि प्रसंगी अंगावर गुन्हे घेतले तरी मागे न हटणारी वृत्ती — ही त्यांची ओळख. संघर्ष हा त्यांचा स्वभाव आहे आणि जनतेसाठी लढणं ही त्यांची सवय.

मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर यांच्या विचारधारेने प्रेरित होऊन त्यांनी समाजकारणाची वाट धरली. विचारांशी निष्ठा आणि कृतीत प्रामाणिकपणा यामुळेच ते आज कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शक ठरले आहेत.

पत्रकारितेच्या क्षेत्रातही त्यांनी तितकाच दमदार ठसा उमटवला आहे. पुण्यनगरीचे रिसोड तालुका प्रतिनिधी आणि रिसोड सिटी न्यूजचे मुख्य संपादक म्हणून त्यांनी निर्भीड लेखणी हाताळली. सत्तेला सवाल करणारी आणि सामान्यांच्या वेदनांना शब्द देणारी पत्रकारिता त्यांनी जपली. त्यांची लेखणी ही केवळ शाईने नाही, तर सामाजिक जबाबदारीच्या जाणिवेने लिहिली जाते.

अर्जुन पाटील खरात हे राजश्री शाहू बँक तसेच विविध कार्यकारी सोसायटी, रिसोड संस्थेमध्ये तज्ञ संचालक म्हणून कार्यरत आहेत. आर्थिक निर्णय घेताना सामान्य माणसाचा फायदा प्रथम कसा होईल, याचाच ते विचार करतात. पद मोठं असलं तरी मन मात्र जमिनीवर घट्ट रोवलेलं — हीच त्यांची खरी ताकद.

हे सगळं करत असताना त्यांनी शेतीशी असलेली नाळ कधीही तुटू दिली नाही. स्वतःच्या शेतात आधुनिक शेती, दुधाचा व्यवसाय, कष्ट आणि शिस्त — यामधून त्यांनी एक आदर्श कास्तकार म्हणूनही आपली छाप निर्माण केली. समाजकारण, पत्रकारिता आणि शेती या तिन्ही क्षेत्रांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्वात दिसतो.

विशेष म्हणजे, एवढ्या जबाबदाऱ्या सांभाळूनही त्यांच्या चेहऱ्यावर गर्वाचा लवलेश नाही. सर्वांना आपलेसे वाटणारे, प्रेमळ, संयमी आणि इतरांप्रती आदर बाळगणारे व्यक्तिमत्व — हीच त्यांची खरी ओळख. समाजसेवेचा घेतलेला इडा शेवटपर्यंत खाली न ठेवण्याचा त्यांचा निर्धार अनेक तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरतो.

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ शुभेच्छाच नाहीत, तर त्यांच्या कार्याला सलाम करण्याचा दिवस आहे. कारण काही वाढदिवस हे केवळ वय वाढण्याचे नसतात… ते एका संघर्षमय, प्रेरणादायी प्रवासाचा गौरव करण्याचे असतात.

अर्जुन पाटील खरात (मामाश्री)यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांची जनसेवेची वाटचाल अशीच धगधगती, तडफदार आणि लोकांच्या काळजाला भिडणारी राहो — हीच सदिच्छा.

**संकलन : करण धोंगडे**
**दैनिक युवक आधार, वाशिम जिल्हा प्रतिनिधी…**
**जिल्हाध्यक्ष वाशिम निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य..**

# मा. रणजीत दादा मेश्राम यांचे दुःखद निधन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी डॉ सुनील भगत/ दक्षिण नागपूर :** आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ समाजसेवक, प्रखर विचारवंत, साहित्यिक, पत्रकार आणि सामाजिक-राजकीय विश्लेषक मा. रणजीत दादा मेश्राम यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या जाण्याने आंबेडकरी चळवळ, सामाजिक क्षेत्र आणि पत्रकारितेच्या विश्वात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.



रणजीत मेश्राम हे नागपूर येथील ज्येष्ठ पत्रकार, शिक्षणतज्ज्ञ (प्राध्यापक) आणि प्रभावी वक्ते म्हणून ओळखले जात होते. त्यांनी सामाजिक-राजकीय प्रश्न, दलित चळवळ, आंबेडकरी विचारसरणी आणि सामाजिक परिवर्तन या विषयांवर सखोल अभ्यासपूर्ण विश्लेषण मांडले. इतिहास, सामाजिक जाणीव आणि समकालीन समाजात आंबेडकरी विचारांची प्रासंगिकता यावर त्यांनी विविध व्याख्यानांतून प्रभावी मार्गदर्शन केले.

त्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चेअर अंतर्गत व्याख्याने देत विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना मार्गदर्शन केले. नागपूरसह विविध सार्वजनिक मंचांवर त्यांच्या भाषणांना मोठा प्रतिसाद लाभला होता.

दलित समाजाचा इतिहास, सामाजिक न्याय आणि समता यासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले. त्यांच्या लेखनातून आणि विचारांतून अनेक तरुण कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळाली.

त्यांचे पार्थिव दिनांक 05 मार्च 2026 रोजी अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात येणार असून त्यानंतर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो, हीच भावपूर्ण श्रद्धांजली .

# महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन

## छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा १ चे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**श्री क्षेत्र माहूर(प्रतिनिधी) सय्यद ईसा :** महसूल व वन विभागाची सर्व कामे एकाच छताखाली व्हावी यासाठी महाराष्ट्र शासनाकडून शासन निर्णय महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. मराअ-२०२६ प्र.क्र.०१ समन्वव-१, दिनांक १८/०२/२०२६.लोकाभिमुख प्रशासनमहसूल विभागाच्या सेवा नागरिकांच्या दारी पोहोचवून प्रशासन अधिक गतिमान करणे.

नागरिकांच्या दैनंदिन महसूल विषयक तक्रारींचे एकाच ठिकाणी तात्काळ निवारण करणे.7/12 डिजिटल ७/१२, ८अ उतारे आणि सिंगल डे सर्विस डिलिव्हरी प्रणालीचा प्रभावी वापर करणे. यासह इतर सुविधांचा समावेश असल्याने या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन तहसीलदार अभिजीत जगताप यांनी केले आहे



महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी राहुल कर्डिले सहायक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तूला यांच्या मार्गदर्शनाखाली माहूर तहसील कार्यालय अंतर्गत वानोळा सिंदखेड वाई बाजार माहूर या चार मंडळात हे शिबिर होणार आहे वानोळा येथे दि 7. 3.2026 रोजी सिंदखेड येथे दि 14.3.2026 रोजी वाई बाजार येथे दि 10.4.2026 रोजी आणि माहूर येथे 8.5.2026 रोजी या भव्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे

या शिबिरात महसूल दस्तऐवज महसूल दस्ताऐवज प्रलंबित फेरफार निकाल, ७/१२ दुरूस्ती, डिजिटल ७/१२ व ८अ उतारा वितरण.लोकसेवा हक्क दाखले उत्पन्न रहिवासी, जात आणि नॉन-क्रीमी लेयर प्रमाणपत्रे. सिंगल विंडो प्रणाली एकाच ठिकाणी अर्ज स्वीकारणे, पडताळणी आणि तात्काळ सेवा वितरण. यासह विविध सेवा देण्यासाठी तहसीलदार व नायब तहसीलदार पर्यवेक्षण, समन्वय आणि शिबीर प्रभारी मंडळ अधिकारी व तलाठी स्थानिक नियोजन अर्ज स्वीकारणे, कागदपत्रांची पडताळणी आणि सेवा अद्ययावत करणे.सनियंत्रण व अहवाल डॅशबोर्ड प्रपत्र अ-१ ते अ-६ अधिकृत अहवाल नमुना फेरफार निकाली काढणे, ७/१२ दुरूस्ती अर्ज, डिजिटल ७/१२ वितरण आणि प्रमाणपत्र वितरणाचा दैनंदिन प्रगती अहवाल. सादर होणार आहे त्यामुळे नागरीकानी आवश्यक कागदपत्रांसह आपल्या संबंधित मंडळाच्या शिबीराच्या दिवशी आवश्यक मूळ कागदपत्रे व छायांकित प्रतींसह वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन तहसीलदार अभिजीत जगताप यांनी केले आहे.

# मुदखेड पालिका स्वीकृत सदस्यपदासाठी इच्छुकांची गर्दी

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड | प्रतिनिधी //योगेश चौदंते** : मुदखेड नगर परिषदेतील स्वीकृत सदस्य निवडीची प्रक्रिया सुरू झाली असून इच्छुकांनी आपले अर्ज नगराध्यक्ष विश्रांती कदम यांच्या कडे दाखल करण्यात आले आहे.

नगर परिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच बाजार समिती या स्तरावर स्वीकृत सदस्यांची निवड होणार आहे. या पार्श्वभूमीवर विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता वाढली आहे.

भाजप पक्षाच्या माध्यमातून स्वीकृत सदस्यपदासाठी इच्छुकांची चांगलीच चढाओढ पाहायला मिळत आहे.पत्रकार ईश्वर पिनलवार यांनी देखील स्वीकृत सदस्यपदासाठी अर्ज दाखल केला आहे.

सामाजिक, शैक्षणिक व पत्रकारितेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून त्यांनी मुदखेड तालुक्यात सक्रिय कार्य केले असुन त्यामुळे त्यांच्या नावाची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.खासदार अशोकराव



चव्हाण यांनी आमदार जितेश आंतापूरकर यांच्या पोटनिवडणुकीत प्रचार यंत्रणेत पत्रकार ईश्वर पिन्नलवार यांची निवड करण्यात आली होती.

तसेच आमदार श्रीजया चव्हाण यांच्या भोकर विधानसभा निवडणुकीत दिलेल्या जवाबदारी पारपाडत मुदखेड नगरपरिषद निवडणुक व नुकत्याच झालेल्या नांदेड महापालिका निवडणुकीत त्याचं कार्य महत्त्वाचं ठरलं.

मुदखेड नगरपरिषद स्वीकृत सदस्य पदासाठी इच्छुक असलेले ईश्वर पिन्नलवार यांच्यासह राम आंबादार, ऋषिकेश पारवेकर, शिवा तरोडेकर, साहेबराव देशमुख, अमोल आडकिणे, कपिल लोखंडे यांच्या सह आदी एकूण १७ ते १८ इच्छुकांनी अर्ज भरले आहेत.ईश्वर पिनलवार हे गेल्या २५ वर्षांपासून पत्रकारितेत कार्यरत असून त्यांनी विविध सामाजिक प्रश्नांवर सातत्याने लेखणी चालवली आहे. ते सध्या येथील मारोती मंदिर संस्थानचे अध्यक्ष तसेच सन्मित्र गृह निर्माण सहकारी संस्थेचे चेअरमन म्हणूनही कार्यरत आहेत.

याशिवाय जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सहसचिव म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे.स्वीकृत सदस्यपदासाठी खासदार अशोकराव चव्हाण यांनी कोणाची निवड करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले असून आगामी काळात नगर परिषदेतील राजकीय घडामोडींना वेग येण्याची शक्यता आहे.

# तिगाव येथे त्रिदिवसीय भव्य शंकर पटाचा थरार; अनिल बिसेन यांच्या हस्ते शानदार उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड/ गोंदिया जिल्हा प्रतिनिधी :** गोंदिया जिल्हा तिगाव ग्रामीण संस्कृतीचे वैभव आणि वैशिष्ट्य असलेल्या त्रिदिवसीय भव्य शंकर पटाचे (बैलगाडा शर्यत) आयोजन तिगाव येथे करण्यात आले आहे. आज दिनांक २८ फेब्रुवारी रोजी या ऐतिहासिक पटाचा उद्घाटन सोहळा परिसरातील मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.

**मुख्य उद्घाटन आणि अध्यक्ष**

या भव्य शंकर पटाचे उद्घाटन देवरी पंचायत समितीचे सभापती मा. अनिल बिसेन यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंजोरा जिल्हा परिषद क्षेत्राच्या सदस्या सौ. उषाताई मेंढे लाभल्या होत्या.

प्रमुख पाहुणे आणि निमंत्रित मान्यवर

या उद्घाटन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून ललित ठाकूर आणि दिगंबर बोपचे उपस्थित होते. त्यांच्यासह खालील प्रतिष्ठित व्यक्तींनी कार्यक्रमाची शोभा वाढवली:

कुंजन कुमार तुरकर (सरपंच, तिगाव तथा रिपोर्टर)

अशोक शेंडे सर (मुख्याध्यापक, समर्थ विद्यालय)



यशवंतराव पुंड आणि अशोक पटले

संदीप तिरेले (उपसरपंच)

दुधरामजी गायधने (माजी पोस्ट मास्टर) व घनश्याम गायधने (पोलीस पाटील)

कैलास मेश्राम (तंटामुक्ती अध्यक्ष)

दिनेश बोपचे (ग्रामपंचायत सदस्य)

नरेश बोपचे (संपादक, सत्य को जानो न्यूज)

आयोजन आणि व्यवस्थापन समिती

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी समितीच्या सदस्यांनी चोख नियोजन केले आहे:

समिती नेतृत्व: मधुजी रांगडाले (अध्यक्ष), हसलाल भोंडे (उपाध्यक्ष).

मैदानी व्यवस्थापन: राहुल ठाकरे (घडी मास्तर), प्रशांत तुरकर (झेंडी मास्तर) आणि राजू काळसर्पे (व्यवस्थापक).

निर्णायक मंडळ: प्रवीण बोपचे आणि आनंद बोपचे.

समिती सदस्य व सहकार्य: कमला प्रसाद हरिणखेडे, मोहन मडावी, गोपीचंद मडावी, बबलू बघेले, कन्हैया बोपचे, राहुल बोपचे, श्रीराम मुनेश्वर, व्यंकटजी गायधने, उज्ज्वल शेंडे, आकाश बिसेन, आशिष बोपचे आणि अंकित बोपचे.

गावकरी व दर्शकांचा मोठा प्रतिसाद

या उद्घाटन प्रसंगी तिगावसह परिसरातील इतर गावकरी, नागरिक, समितीचे अन्य सदस्य, बैलजोडी मालक, कातकरी आणि हजारो दर्शक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मैदानातील थरार पाहण्यासाठी प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली होती.

# रिसोड येथे पर्यावरणपुरक होलिकोत्सव कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी /रणजीत सिंह ठाकुर :** होळी आणि रंगपंचमी हे दोन दिवस म्हणजे लहानापासून तर वयोवृध्दापर्यंत विविध रंगांची उधळण,मुक्तसंचार,तसेचं मनामध्ये इतरांबद्दल काही कारणास्तव कित्येक दिवसापासून कुजलेल्या भाव-भावनांना वाट मोकळी करून देत मनोमिलन घडवून आणण्याची एक पर्वणीच आहे असे म्हणने वावगे होणार नाही. वाईटावर चांगल्याचा विजय मिळविण्याकरिता सकारात्मकतेच्या रंगांची उधळण होणे आवश्यक आहे.हे जरी खरे असले तरी सद्धस्थितीत उपलब्ध असणार्या कृत्रिम रंगामध्ये कॉपर सल्फेट,मर्क्युरी सल्फाईड इत्यादी घातक रसायने असल्याकारणाने ह्या रंगासोबत होळी खेळणे कितपत योग्य आहे असा प्रश्न वृक्षमित्र गजानन मुलंगे ह्यांनी स्वतःच्या घरी आयोजित केलेल्या पर्यावरणपूरक होलिकोत्सव कार्यक्रमादरम्यान व्यक्त केले. कार्यक्रमाकरिता दिगांबर खरबळ शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती रिसोड,अरूण पडवे नायब तहसिलदार वाशिम,मेघश्याम पत्रे केंद्रप्रमुख निजामपूर,श्यामल डांगे सदस्या नगर परिषद रिसोड इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते.उकळत्या पाण्यामध्ये पळसाच्या केसरी फुलांच्या पाकळ्या टाकून केसरी रंग तयार करण्याचे प्रात्याक्षिक



करून दाखविण्यात आले तसेचं खरबळ ह्यांनी बीट या कंदमुळापासून गर्द लाल रंग,पालकापासून गर्द हिरवा रंग तयार करण्याच्या सोप्या पध्दतीचे वर्णन केले.आज प्रत्येक व्यक्तीकडे माकूल पैसा आहे पण आत्मसमाधान व घरामध्ये शांतता किती परिवाराकडे आहे हा कळीचा मुद्दा आहे. आजरोजी मुलांना बाजारातील प्रत्येक वस्तू खरेदी करून दिल्यापेक्षा पालकांनी आर्वजून वेळ काढून जर त्यांना प्रसंगानुरूप छोट्या-मोठ्या वस्तू तयार करण्यास प्रोत्साहित केले तर त्यांच्या हातामध्ये जवळपास 24 तास चिकटून राहणारा मोबाईल हिसकावून घेण्याची वेळ येणार नाही.पाल्यांच्या प्रत्येक विचारांना पैशात मोजण्यापेक्षा त्यांना कृतिशील ठेवणे काळाची गरज आहे.सरते शेवटी "लहान करा होळी,दान करा पुरणपोळी" चा संदेश देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# एसटीच्या 'शिवनेरी' ची झेप आता मुंबई–पुण्याच्या पलीकडे! परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची घोषणा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** मुंबई–पुणे महामार्गाची 'राणी' म्हणून ओळख मिळवलेल्या एसटीच्या अत्याधुनिक, आरामदायी आणि सुरक्षित 'शिवनेरी' बस सेवेची झेप आता राज्यभर घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लवकरच मुंबई–पुणे मार्गाच्या पलीकडे महाराष्ट्रातील प्रमुख शहरांदरम्यान शिवनेरी धावणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

सन २००२ मध्ये सुरू झालेल्या शिवनेरी सेवेने वक्तशीरपणा, उत्कृष्ट आसनव्यवस्था आणि सुरक्षित प्रवास या गुणवैशिष्ट्यांमुळे उच्च मध्यमवर्गीय प्रवाशांचा विश्वास जिंकला. इतर बससेवेपेक्षा तिकीटदर थोडे अधिक असतानाही सातत्याने मिळणाऱ्या उत्तम प्रतिसादामुळे ही सेवा सुरुवातीपासूनच नफ्यात आहे, असे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.

२०० अत्याधुनिक व्होल्व्हो बसांची खरेदी

राज्यभर विस्तारासाठी २०० नवीन




अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त व्होल्व्हो बसेस खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया सुरू आहे. या बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होताच, मुंबई–पुणेप्रमाणेच इतर महत्त्वाच्या शहरांदरम्यानही शिवनेरी सेवा सुरू होईल.

**प्रस्तावित मार्गांमध्ये**

नाशिक–पुणे, नाशिक–छत्रपती संभाजीनगर, नाशिक–जळगाव–धुळे, पुणे–कोल्हापूर, पुणे–सांगली, पुणे–सोलापूर, नागपूर–चंद्रपूर, नागपूर–अमरावती–अकोला अशा प्रमुख शहरांचा समावेश आहे. त्यामुळे राज्याच्या विविध भागांतील प्रवाशांना आलिशान, सुरक्षित आणि विश्वासार्ह प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार आहे.

ई-बस सेवेलाही उत्तम प्रतिसाद

सध्या दादर–स्वारगेट, दादर–शिवाजीनगर, बोरीवली–स्वारगेट, बोरीवली–शिवाजीनगर, ठाणे–स्वारगेट आणि ठाणे–शिवाजीनगर या मार्गांवर पर्यावरणपूरक ई-शिवनेरी बस सेवा सुरू असून प्रवाशांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

ज्येष्ठ व महिलांसाठी सवलती

महिला प्रवाशांना तसेच ६५ ते ७५ वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांना तिकीटदरात ५० टक्के सवलत, तर ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना शिवनेरी प्रवास पूर्णपणे विनामूल्य आहे. त्यामुळे नव्या मार्गांवरही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळेल, असा विश्वास मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला.

३० 'स्लिपर शिवनेरी'ची भर

नवीन २०० बसेसमध्ये ३० शयनयान (स्लिपर) बसेसचा समावेश असेल. सध्या ज्या मार्गांवर विना-वातानुकूलित शयनयान बससेवा आहे, त्या ठिकाणी 'स्लिपर शिवनेरी' सुरू करून प्रवासी सेवेला अधिक उन्नत रूप दिले जाणार आहे. आरामदायी बेड-कोच सुविधा, सुरक्षितता आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे दीर्घ पल्ल्याच्या प्रवासात प्रवाशांना नव्या अनुभवाची हमी मिळणार आहे.

'शिवनेरी'चा हा विस्तार म्हणजे केवळ बससेवेची वाढ नव्हे, तर महाराष्ट्राच्या प्रगत आणि गतिमान प्रवाससंस्कृतीची नवी दिशा आहे.असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

# तिसऱ्या राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत फ्रीडम शाळेच्या विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी/ अकोट:-** अंजनगाव येथे झालेल्या तिसऱ्या राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत फ्रीडम शाळेच्या विध्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेमध्ये तब्बल ४०० हून अधिक विद्यार्थ्यांनि सहभाग घेतला होता. इतक्या मोठ्या स्पर्धकांच्या स्पर्धेत



फ्रीडम शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर यश संपादन करून शाळेचा लौकिक उंचावला आहे.

ही कामगिरी केवळ यश नसून शिस्त, सातत्य, आत्मविश्वास आणि कठोर परिश्रम यांचे उत्तम उदाहरण आहे. विजेत्या मुलांमध्ये वयोगट १७ वर्षे – मुले प्रथम क्रमांक – कृष्णल कुलट द्वितीय क्रमांक – खुशाल दाभाडे चतुर्थ क्रमांक – कुणाल कपले वयोगट १४ वर्षे – मुली चतुर्थ क्रमांक – मैत्री वानखेडे पंचम क्रमांक – प्रांजली अस्वार वयोगट १७ वर्षे – मुली चतुर्थ क्रमांक – नंदनी साळुंखे इतक्या मोठ्या संख्येतील स्पर्धकांमधून आपले स्थान निर्माण करणे ही खरोखरच अभिमानाची गोष्ट आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या गुरुजनांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे .

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# घाटंजीच्या स्वराज गिराम ची राष्ट्रीयस्तरावर चमकदार कामगिरी

## अनिरा प्रोऍक्टिव्ह अबॅकस सेंटर ला विदर्भ बेस्ट सेंटर अवॉर्डने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी/महेश पेन्दोर** : दिनांक 26 फेब्रुवारी 2026 रोजी गणेश कला क्रीडा पुणे येथे पार पडलेल्या या भव्य,प्रतिष्ठित स्पर्धेत देशभरातुन विविध राज्यातील 4800 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत वेग, अचूकता आणि एकाग्रता या तीन घटकांची कसोटी लागणाऱ्या कठीण गणितीय प्रश्नांची सोडवणूक करावी लागत होती. घाटंजी मधील स्वराज केशव गिराम वर्ग 2री च्या विद्यार्थ्याने राष्ट्रीय स्तरावरील ' स्पर्धेत विलक्षन गणिती कौशल्याच्या जोरावर 4.11 मिनटा मध्येच 100 पैकी 100 गुण मिळवून सर्वोच्च स्थान मिळवले सहा मिनिटात 100 गणिते सोडविण्याच्या कठीण आव्हानात त्याने अचूकता आणि वेग याचा अप्रतिम समन्वय साधत परीक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व रेंजर सायकल प्रदान करण्यात आले.तसेच डॉली भोयर, अवनी वाघाडे,तृप्ती संगणवार, अनुष्का बिजेवार,आराध्या गराटे, आर्या पाटील,प्रंशुल बेंडे,शिवश्री भोयर,शौर्य बांगरे,ओनस्वी जक्कुलवार यांनी दुसरा,तिसरा,चौथा,पाचवा क्रमांक मिळवला



व धैर्य गंडेचा,अधिरा गुडंकवार,परित्त पाटील,हिमांशु मानकर, शरण्या मानकर, स्वराज पारधी, राज ठाकरे, आशिमरा सय्यद, निधी पोटे, ईश्वर निबूदे, स्वरूप अंजीकर, अभिर वानखेडे,प्रणुषा बेंडे, राधिका राऊत यांना बेस्ट परफॉर्मन्स ट्रॉफी मिळाली सोबतच आई वडिलांचे शिक्षकांचे व घाटंजी(यवतमाळ)चे नाव उज्ज्वल केले आहे.

या यशामागे त्याची सातत्यपूर्ण मेहनत, गणितावरील प्रचंड आवड आणि घाटंजी येथील अनिरा प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लासेसच्या संचालक अनिकेत भोयर व अक्षरा भोयर(राऊत)यांचे मार्गदर्शन आहे परिसर अभिमानाने भारावून गेला आहे

# भाजपकडून मायाताई ईवनाते यांना राज्यसभा उमेदवारीची संधी

## नागपूरच्या माजी महापौरांची केंद्रीय निवडणूक समितीकडून निवड

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी/नागपूर** : भारतीय जनता पार्टीच्या केंद्रीय निवडणूक समितीकडून महाराष्ट्रातील राज्यसभा द्विवार्षिक निवडणुकीसाठी मायाताई ईवनाते यांच्या नावाला अधिकृत स्वीकृती देण्यात आली आहे. त्यांच्या उमेदवारीमुळे नागपूरसह विदर्भात भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मायाताई ईवनाते या नागपूरच्या माजी महापौर असून त्यांनी १५ डिसेंबर २००७ ते २३ डिसेंबर २००९ या कालावधीत नागपूर महानगरपालिकामध्ये महापौर पद यशस्वीरीत्या भूषवले. शहर विकास, पायाभूत सुविधा आणि सामाजिक प्रश्नांवर त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली.

त्या अनेक वर्षांपासून नागपूर शहर भाजपमध्ये सक्रिय असून शहर व प्रदेश पातळीवर विविध जबाबदाऱ्या



सांभाळण्याचा त्यांना मोठा अनुभव आहे. आदिवासी समाजातून येणाऱ्या मायाताई यांनी समाजाच्या प्रश्नांना नेहमीच प्राधान्य दिले आहे.

त्यांनी राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग (NCST) च्या सदस्यपदाची जबाबदारीही यशस्वीपणे पार पाडली आहे. आदिवासी हक्क आणि कल्याणाच्या विषयांवर त्यांनी ठोस भूमिका मांडली.

राष्ट्रीय पातळीवर जबाबदारी त्या राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग एनएसएसटी च्या सदस्य पदी कार्यरत राहिलेले आहेत आदिवासी समाजातून एक त्यांनी वंचित घटकांच्या प्रश्नासाठी सातत्याने आवाज उठविला आहे."

**संघटन कौशल्य व अनुभव**

शहर व प्रदेश भाजपमध्ये विविध पदावर काम करण्याचा प्रदीर्घ अनुभव त्यांना आहे संघटन बांधणी प्रशासनातील पारदर्शकता आणि विकास भिमुख भूमिका ही त्यांची ओळख मानली जाते."

**अपेक्षा**

राज्यसभेत त्यांच्या माध्यमातून विदर्भातील विकास प्रश्न तसेच आदिवासी समाजाच्या मागण्या प्रभावीपणे मांडल्या जातील अशी अपेक्षा व्यक्त होत आहे."

**त्यांचा राजकीय प्रवास पुढीलप्रमाणे उल्लेखनीय राहिला आहे —**

- 2002 – नगरसेवक (भाजप)
- 2007 – महापौर, नागपूर
- 2012 – नगरसेवक (भाजप प्रदेश उपाध्यक्ष)
- 2017 – राष्ट्रीय आदिवासी सदस्य
- 2026 – नगरसेवक, प्रभाग 12 तसेच अग्निशमन सभापती, मनपा नागपूर

2026 च्या नागपूर महानगरपालिका निवडणुकीत त्या प्रभाग 12 मधून भाजपच्या नगरसेवक म्हणून निवडून आल्या असून यापूर्वीही त्यांनी अनेक वर्षे नगरसेवक म्हणून कार्य केले आहे.

राज्यसभा उमेदवारीच्या घोषणेमुळे नागपूर व विदर्भातील आदिवासी समाजाला राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे. पक्ष नेतृत्वाने त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्यावर पुन्हा एकदा विश्वास दाखवला आहे.

# लाईनमन' हा शब्द नाही, तर जिद्दीचे प्रतीक;

## नागपूरच्या दिपाली खोब्रागडे यांचा दिल्लीत होणार राष्ट्रीय गौरव

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू /संपादक नागपूर विभाग** : आज 'राष्ट्रीय लाईनमन दिना'चे औचित्य साधत महावितरणच्या नागपूर विभागातून एक अत्यंत प्रेरणादायी बातमी समोर आली आहे. महाल विभागामध्ये वरिष्ठ तंत्रज्ञ म्हणून कार्यरत असलेल्या दिपाली खोब्रागडे यांची 7 मार्च रोजी नवी दिल्ली येथे आयोजित विशेष सोहळयात राष्ट्रीय स्तरावर गौरव करण्यासाठी निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी महाराष्ट्रातून निवडल्या गेलेल्या चार कर्मचाऱ्यांमध्ये दिपाली खोब्रागडे या एकमेव महिला आहेत. त्यांच्या या यशाने महावितरणचा मान उंचावला असून, ही कामगिरी संपूर्ण विभागासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

या यशाचे सेलिब्रेशन करण्यासाठी आज नागपूर परिमंडल कार्यालयातर्फे काटोल रोडस्थित 'विद्युत भवन' येथे



सत्कार सोहळा पार पडला. यावेळी मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या हस्ते दिपाली यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन विशेष गौरव करण्यात आला. यावेळी अधीक्षक अभियंता अमित परांजपे व संजय वाकडे, कार्यकारी अभियंता महेश चतुर्वेदी, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने यांच्यासह विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती होती.आपल्या गौरव सोहळयाला उत्तर देताना दिपाली खोब्रागडे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्या म्हणाल्या, "लाईनमन हे केवळ एक पद आहे, ते लिंगावर आधारित नाही. लाईन हेल्परपासून मुख्य अभियंत्यापर्यंत प्रत्येक कर्मचारी हा महावितरणचा एक 'लाईनमन'च आहे. मला सुरुवातीपासूनच काहीतरी आव्हानात्मक करण्याची ओढ होती. सुरक्षिततेच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी हीच माझी खरी शक्ती आहे. जोखमीचे काम हाती घेण्यापूर्वी काही क्षण केलेली मानसिक तयारी मला अधिक आत्मविश्वास देते." कुटुंबाची साथ आणि सहकाऱ्यांचे सहकार्य याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. ग्राहकांकडून मिळणारा आदर हा भीतीचे सावट दूर करणारा असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, ग्राहकांनी वीज सुरक्षिततेबाबत अधिक साक्षर राहणे ही काळाची गरज असल्याचे सांगत, तरुणांना जिद्दीने या क्षेत्रात येण्याचे आवाहन त्यांनी केले.मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी दिपाली खोब्रागडे यांच्या कामगिरीचे तोंडभरून कौतुक केले. हा गौरव केवळ नागपूर परिमंडळाचा नसून संपूर्ण महावितरणचा असल्याचे सांगत त्यांनी दिपाली यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात विद्यापीठ समन्वयकांची दमदार उपस्थिती!

**दैनिक युवक आधार**

**सिद्धार्थ धंदरे /चिखली तालुका प्रतिनिधी** : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ सलग्न श्री गजानन महाराज कृषी व शैक्षणिक संस्था संचलित समर्थ कृषी महाविद्यालय, देऊळगाव राजा येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) सात दिवसीय विशेष शिबिराला मा. डॉ. संदीप हाडोळे (विद्यार्थी कल्याण अधिकारी तथा विद्यापीठ समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना) यांची सदिच्छा भेट लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे शिबिराला विशेष उर्जा आणि प्रेरणेची जोड मिळाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन मेहेत्रे सर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संदीप हाडोळे सर उपस्थित होते. यावेळी प्रा. सोळंकी सर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. चगदळे सर तसेच विद्यार्थी प्रतिनिधी निखिल धंदरे यांची उपस्थिती कार्यक्रमाला लाभली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.




नितीन मेहेत्रे यांनी करत शिबिराच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकला. त्यानंतर डॉ. संदीप हाडोळे यांनी स्वयंसेवकांशी थेट संवाद साधत राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व अधोरेखित केले.

स्वयंसेवकांनी शिबिरादरम्यान राबविलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचे त्यांनी मनापासून कौतुक केले व पुढील

> **“राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ शिबिरापुरती मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि समाजाशी घट्ट नाते निर्माण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची चळवळ आहे. स्वयंसेवकांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून कार्य करावे.”**
>
> **– डॉ. संदीप हाडोळे**

वाटचालीसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांच्या भेटीमुळे स्वयंसेवकांचा उत्साह द्विगुणित झाला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोमल इंगळे व कल्याणी गरड यांनी उत्कृष्टरीत्या केले. शिबिरातील विविध उपक्रमांचा अभिप्राय शंकर देवकर व शितल सोमनकर यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शंकर देवकर यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात आणि उत्तम नियोजनासह पार पडला.

# मोबाईल हिसकावला

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : पायी चालणाऱ्या 41 वर्षीय इसमाकडील मोबाईल हिसकावून अनोळखी ईसम मोटरसायकल वरून पसार झाला. या प्रकरणी 2 मार्च रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.मंगेश सुखसे हे सेक्टर चार, करंजाडे येथे राहत असून ते दोन मार्च रोजी सकाळी साडेपाचच्या सुमारास वडाळे तलाव, पनवेल येथे चालण्यासाठी गेले होते. यावेळी त्या ठिकाणी ते कट्टयावर बसले. काळया रंगाची केटीएम मोटरसायकल वरून अनोळखी इसम त्यांच्या जवळ आला आणि त्यांच्या हातातील 70 हजार रुपये किमतीचा मोबाईल खेचून तो पळून गेला.

# साहित्य क्षेत्रातील अशोकराव टाव्हरे यांचे योगदान उल्लेखनीय – डॉ. श्रीपाल सबनीस

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : पद्मश्री नामदेवराव ढसाळ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सतत तीन वर्षे कनेरसर, मुंबई , राजगुरुनगर येथे साहित्य संमेलन आयोजित करून विविध क्षेत्रात कार्यरत राहून साहित्यासाठी कवी-लेखक अशोकराव टाव्हरे हे उल्लेखनीय योगदान देत आहेत असे मत ज्येष्ठ साहित्यिक व ८९ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी तिसऱ्या पद्मश्री नामदेवराव ढसाळ स्मृती साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले.दोन कवितासंग्रह, लेखसंग्रह, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या कार्यावर मराठी व इंग्रजीत पुस्तकांचे लेखन, अनेक स्मरणिका व विशेषांकाचे संपादन करून




अशोकराव टाव्हरे हे प्रतिभावंत साहित्यिक म्हणून नावारूपास येत आहेत. समाजाच्या विविध क्षेत्रात कार्यरत राहण्याचे टाव्हरे यांचे कसब व त्यांची पत्नी सुरेखा टाव्हरे यांची त्यांना असलेली साथ गेली तीन वर्षे साहित्य संमेलनात अनुभवत आहे असे डॉ. श्रीपाल सबनीस यांनी नमुद केले.पुर- कनेरसर चे सुपुत्र व विश्वसाहित्यिक नामदेवराव ढसाळ यांचा वारसा जतन करण्यासाठी व वाचन संस्कृती वृध्दींगत करण्यासाठी टाव्हरे गेली तीन वर्षे साहित्य संमेलनाचे यशस्वीपणे आयोजन करीत आहेत. ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे असे सांगून डॉ.श्रीपाल सबनीस व त्यांच्या सुविद्य पत्नी कवयित्री ललिता सबनीस यांनी टाव्हरे दाम्पत्याचा सन्मान केला.

# स्वीकृत नगरसेवक पदी प्रथमेश सोमण यांच्या नावावर शिक्कामोर्तब!

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : शिवसेनेचे महानगरप्रमुख आणि पक्षाचे पनवेल मधील तरुण सुशिक्षित नेतृत्व ॲड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांच्या नावावर अखेर शिक्कामोर्तब झाले आहे. प्रथमेश सोमण यांनी आज शिवसेना पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आपला नामनिर्देशन अर्ज दाखल केला. पक्षाचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच स्वतः आमदार प्रशांत ठाकूर यांना फोन करून प्रथमेश सोमण यांच्या नावाची सूचना केल्यावर इतर उलट सुलट चर्चांनाही पूर्णविराम लागला. आपल्या कार्यकर्त्याला दिलेला शब्द पूर्ण करत पनवेलकरांना एक उच्चशिक्षित लोकप्रतिनिधी दिल्याने कार्यकर्त्यांनी एकनाथ शिंदे व खासदार बारणे यांचे आभार मानले. प्रभाग १८ मध्ये त्यांनी हक्काची दावेदारी सोडल्यापासून महायुतीचे समन्वयक म्हणून महापालिका निवडणुकीत जबाबदारी पार पाडली. याशिवाय वर्षानुवर्षे शिवसेना पक्षात विविध पदे भूषवून तथा माजी नगरसेवक म्हणून काम केलेल्या व प्रशासनाचा अनुभव असणाऱ्या प्रथमेश सोमण यांच्या नावाचीच चर्चा पहिल्या दिवसापासून होती. निवडणुकीच्या प्राथमिक जागा वाटपाच्या चर्चेतच त्यांच्या नावावर खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी शिक्कामोर्तब केले होते. ड्युअल टॅक्स,



मालमत्ता कर, डायलिसिस सेंटर, आरक्षित जातींच्या स्कॉलरशिप चा प्रश्न, हॉकर्स लायसन्स, राम मंदिर उद्घाटनाच्या वेळेस उद्भवलेला हिंदू मुस्लिम हिंसेचा प्रश्न, प्रदूषणाच्या प्रश्न पनवेल रेल्वे स्थानकातील रिक्षा युनियनची बांधणी, कामगार युनियनच्या माध्यमातून कामगारांचे प्रश्न, धर्मवीर चित्रपटाचे भव्य प्रीमियर्स, कोविड काळात गणपती विसर्जनाची राबवलेली अभिनव पद्धत, यासह लोकसभा विधानसभा निवडणुकीमध्ये शिवसेना-भाजप महायुतीचे कोर कमिटीचे सदस्य आणि जबाबदार पदाधिकारी म्हणून महत्त्वाच्या भूमिका पार पाडल्या आहेत. गरीब विद्यार्थिनींसाठी सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन चा अभिनव उपक्रम सोमण यांनी राबवला असता या संकल्पनेवर खुश होऊन स्वतः एकनाथ शिंदे यांनीच वैयक्तिक दहा लाख रुपयांची मदत सोमण यांना या योजनेसाठी दिली, तर धर्मवीर चित्रपटाच्या प्रीमियर वेळेसही प्रत्यक्ष न येता ही एकनाथ शिंदे व्हिडिओ कॉल च्या माध्यमातून सोमण यांच्या कार्यक्रमाला उपस्थित राहिले. महापालिका , पोलीस, महसूल अशा प्रशासकीय खात्यांमध्येही प्रथमेश सोमण यांची असलेली सामाजिक पकड व स्वच्छ प्रतिमा ही जमेची बाजू आहे. एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय म्हणून तथा अनेक पक्षप्रवेश करत पक्ष संघटना मजबूत केलेल्या प्रथमेश सोमण यांच्या गळयात नगरसेवक पदाची माळ पडणार असून त्याबद्दल संघटनेतील सर्वच पदाधिकाऱ्यांनी एकमुखी पाठिंबा देत आनंद व्यक्त केला आहे. "सभागृहात शिवसेनेकडून एक अभ्यासू आणि प्रश्नांची जाण असलेला शिवसैनिक म्हणून प्रथमेशचेच नाव योग्य असल्याचा संघटनेतील प्रत्येक पदाधिकाऱ्याचा दावा आहे" असे मत उपजिल्हाप्रमुख परेश पाटील यांनी व्यक्त केले. पूर्वीपासूनच निश्चित असलेली ही नियुक्ती अधिकृत करण्यासाठी महायुतीचे नेते तथा खासदार श्रीरंग आप्पा बारणे व पक्ष सचिव संजय मोरे यांनी देखील शिफारस पत्रे ही दिली आहेत. तर मंत्री उदय सामंत व भरत गोगावले यांनीही सोमण यांचेच नाव दूरध्वनीवरून भाजपच्या नेत्यांना यापूर्वी सुचवले होते. येत्या सहा तारखेला पालिकेच्या महासभेत याबाबत अधिकृत घोषणा होईल. मुख्य नेते एकनाथ शिंदे, राजकारणाचे बाळकडू पाजणारे शिवसेना स्थानिक नेते चंद्रशेखर सोमण, खासदार श्रीरंग आप्पा बारणे, संजय मोरे, आमदार प्रशांत दादा ठाकूर यांसह एक दिलाने सोबत उभे राहणाऱ्या सर्व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचे सोमण यांनी आभार मानले. नामनिर्देशन अर्ज दाखल करताना आज प्रथमेश सोमण यांच्याबरोबर महापौर तथा गटनेते नितीन भाई पाटील, नगरसेवक प्रकाश बिनेदार जेष्ठ शिवसैनिक रमेश गुडेकर, उपनेते शिल्पाताई देशमुख, संपर्कप्रमुख राजेंद्र यादव, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, विधानसभाप्रमुख नितीन काळे, महानगर संघटक मंगेश रानवडे, उपतालुकाप्रमुख जगदीश ठाकुर, तालुका संघटक नरेश नरसिंगे, महिला तालुका प्रमुख मंदाताइ जंगले, उपमहानगरप्रमुख इम्तियाज शेख , सचिन मोरे, महेश सावंत, उपमहानगर समन्वयक राहुल गोगटे, पनवेल शहरप्रमुख प्रसाद सोनावणे, खारघर शहर प्रमुख प्रसाद परब, तळोजे शहरप्रमुख विशाल पवार, शहर समन्वयक राहुल कदम, तळोजे एमआयडीसी प्रमुख प्रकाश म्हात्रे, कामोठे शिवसेनेचे राकेश गोवारी, पनवेल शहर संघटिका प्रीती खानविलकर, नवीन पनवेल शहर संघटिका माया देवडे, कळंबोली शहर संघटिका ज्योतीताई पाटील, स्मिता भोईर, अर्चना जाधव, पनवेल शहर संघटक अभिजीत साखरे, खंडेश धनावडे, सिद्धेश खानविलकर, उपशहर प्रमुख अर्जुन परदेशी, शैलेश जगनाडे, विभागप्रमुख आशिष पनवेलकर, प्रसिद्धी प्रमुख तोफिक बागवान, मंदार काणे, शाखाप्रमुख किरण कळवेकर, किरण पवार व इतर शिवसैनिक उपस्थित होते.

# पनवेल महानगरपालिकेत भाजप महायुतीचे पाच स्विकृत नगरसेवक

## युवानेते परेश ठाकूर, डॉ. अरुणकुमार भगत, गणेश कडू, ॲड. प्रथमेश सोमण, दिनेश खानावकर यांचे अर्ज दाखल







**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल महानगरपालिकेतील स्वीकृत नगरसेवक पदांसाठी भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस-आरपीआय महायुतीच्या वतीने आज (बुधवार, ४ मार्च) अधिकृत उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. महायुतीकडून भाजपचे युवानेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, डॉ. अरुणकुमार भगत, दिनेश खानावकर तसेच शिवसेनेचे ॲड. प्रथमेश सोमण यांनी आपले अर्ज महापालिकेचे सचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी नानासाहेब कामठे यांच्याकडे दाखल केले. महायुतीचे सर्व उमेदवार अनुभवी व अभ्यासू आहेत. त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम करण्याचा दांडगा अनुभव आहे. यावेळी अर्ज दाखल करताना त्यांच्यासमवेत भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, माजी विरोधीपक्षनेते प्रितम म्हात्रे, भाजपचे माजी शहराध्यक्ष व माजी नगरसेवक अनिल भगत, नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार, शिवसेना नेते रमेश गुडेकर, भाजपचे शहर अध्यक्ष व नगरसेवक सुमित झुंझारराव, युवा नेते संजय जैन यांच्यासह इतर लोकप्रतिनिधी उपस्थित होते. नुकताच झालेल्या पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीमध्ये पुन्हा एकदा भाजप महायुतीने वर्चस्व सिद्ध केले. या निवडणुकीत भाजपने ५५, शिवसेनेने २ आणि राष्ट्रवादी काँग्रेसने २ जागांवर विजय मिळवत एकूण ५९ जागांसह पनवेल महानगरपालिकेवर पुन्हा एकदा भाजप महायुतीची भक्कम सत्ता प्रस्थापित केली. त्या अनुषंगाने महापौरपदी नितीन पाटील तर उपमहापौरपदी प्रमिला पाटील विराजमान झाले. ५९ जागांवर विजय मिळाल्यामुळे सातपैकी पाच स्वीकृत नगरसेवक पदे महायुतीच्या वाट्याला आली आहेत. त्यामध्ये सभागृहाचा अनुभव व अभ्यास असलेले परेश ठाकूर, गणेश कडू, डॉ. अरुणकुमार भगत, ॲड. प्रथमेश सोमण, आणि दिनेश खानावकर यांना स्वीकृत नगरसेवकपदाची संधी देण्यात आली आहे. त्यांनी आज आपले उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल केले. निर्वाचित ५९ आणि स्वीकृत पाच अशी एकूण ६४ संख्याबळ महायुतीची होणार आहे.

# भारती विद्यापीठात 'रॅप्सोडी 360' चा बॅनर अनावरण सोहळा उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई (खारघर) :** भारती विद्यापीठ, डिपार्टमेंट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, खारघर येथे महाविद्यालयाच्या वार्षिक महोत्सव 'RhapXody 360' च्या निमित्ताने 26 फेब्रुवारी रोजी बॅनर अनावरण कार्यक्रम उत्साहात पार पडला.




कार्यक्रमाची सुरुवात महोत्सवाच्या अधिकृत बॅनर रिव्हीलने करण्यात आली. त्यानंतर विविध महा विद्यालयांमधून आलेल्या कॉलेज लीडर्स (CLs) यांची विशेष CL Meet घेण्यात आली. या बैठकीमध्ये 'RhapXody 360' या महोत्सवाची संपूर्ण माहिती, विविध स्पर्धांचे स्वरूप, नोंदणी प्रक्रिया तसेच कार्यक्रमाचे वेळापत्रक याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यामुळे विविध महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांपर्यंत या महोत्सवाची माहिती पोहोचविण्यास मदत झाली. यावेळी महोत्सवातील विविध स्पर्धांच्या ट्रॉफींचेही अनावरण करण्यात आले.

त्यानंतर महोत्सवाच्या प्रचारासाठी खारघर परिसरात आकर्षक कार रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये विविध कारवर 'RhapXody 360' या नावाची अक्षरे आणि कार्यक्रमाचे बॅनर्स लावण्यात आले होते. या रॅलीने परिसरातील नागरिकांचे तसेच विद्यार्थ्यांचे विशेष लक्ष वेधून घेतले आणि महोत्सवाबाबत उत्सुकता निर्माण केली.या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रेमाशिष रॉय, विभागप्रमुख डॉ. मोना सिन्हा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख डॉ.अद्वैता घरत यांच्या नेतृत्वाखाली सर्व प्राध्यापक, विद्यार्थी आणि स्वयंसेवकांनी परिश्रमपूर्वक आयोजन केले.या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून आगामी 14 ते 18 मार्च दरम्यान होणाऱ्या 'RhapXody 360' या महोत्सवाबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व स्वयंसेवक यांनी मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले.

# कोकणातील शिमगा सणाला सुरुवात

## संगमेश्वर करजुवे गावातील तेरसे शिमग्याच्या होळीचा होम

**दैनिक युवक आधार**

**रत्नागिरी (सुनील नलावडे) :** कोकणात शिमगोत्सवाला (होळी) फाक पंचमीला सुरुवात होते. तेरसे आणि भद्रेसारख्या अनेक गावांमध्ये होळीच्या परंपरेनुसार शिमग्याला प्रारंभ होतो. रत्नागिरी, संगमेश्वर पट्ट्यात तेरसे मुहूर्तावर होळीचे होम लावले जातात.

कोकणात शिमगोत्सवाचे पडगम आज पासून सुरु झाले असून आज पहिले तेरसे शिमगे पार पडले म्हणजे तेरसे होळीचे होम उत्साह व जल्लोष पूर्ण वातावरणात पार पडले असून उद्या शिमगोत्सवावर ग्रहणाचे सावट पडले असून पुढील भद्रे व पौर्णिमेचे शिंगे एक दिवस पुढे गेले असून त्यांचे होलिकोत्सवातील होम ३ तारखे पासून पाठोपाठ होम लागणार आहेत. या ग्रहणामुळे चाकरमान्यांना आपला शिमगोत्सवाचा कार्यक्रम बदलावा लागला.



कोकणातील शिमगोत्सव १४ फेब्रुवारी पासून प्रत्यक्षात सुरु झाला असून गेल्या शनिवारी २१ तारखेला फाक पंचमी सुरु झाली तर रविवार सकाळ पासून खेळे बाहेर पडले ते सोमवारी व नंतर मंगळवारी देवाचे हे खेळे पार पडले, शनिवारी २८ तारखेला शिमगोत्सवातील गोड्या सणाला सुरुवात होऊन शनिवारी पालखी मध्ये देव मंदिरातून विराजमान झाले व त्या रात्री पासून प्रथम शिमगोत्सवातील माड आणले गेले व पहाटे पर्यंत समस्त चाकरमानी व ग्रामस्थ व मानकऱ्यांच्या सहभागाने ढोल ताशांच्या गजरात फाका घालत माड उभे राहिले. त्या पैकी पहिले तेरस आज दुपारी १ वाजता शिमगोत्सवाचे होम गावो गाव लागले होळ्या पेटवण्यात आल्या. आज करजुवे फुणगुस अन्य खाडी पट्ट्यातील अनेक गावांमध्ये तेरसे शिमगे पार पडले व होळींना होम लावण्यात आले. मानानुसार होमा मध्ये नारळ फेकण्याचे होळीतील महत्वाचे कार्य पार पडले तर गावागावातील नवं दाम्पत्यांनी लग्ना नंतर जोडीने प्रथेनुसार होळीमध्ये नारळ फेकण्याचे काम करून प्रथा जोपासल्या. होलिको उत्सवात या प्रथेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. होम पार पडल्या नंतर होळीच्या कुठावर समस्त मानकऱ्यांनी होळीच्या कुठाला प्रदक्षिणा घालून प्रथा पार पाडली. व त्यानंतर होळी कुठावर माहेर वासिनींनी ओट्या भरल्या.

आज संध्याकाळ पासून पालख्या गाव प्रदक्षिणेत बाहेर पडणार आहेत. हा शिमगोत्सव १९ मार्च पाडव्या पर्यंत चालू राहणार असून पाडव्याच्या दिवशी माड तोडण्याचा महत्वपूर्ण कार्यक्रम होऊन समाप्ती होईल. करजुवे संगमेश्वरमधील श्री.देवी तळेकरीण देवीचे शिंगे व होम पार पडले.

# रेणुका देवी डोंगर पायथ्याशी अवैध धंद्यांचे पेव

## दैनिक युवक आधार उपसंपादक महाराष्ट्र – राजु शिंदे

### नागरिकांचा तीव्र संताप, तातडीच्या कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**मंठा | प्रतिनिधी :** मंठा शहरातील उस्वद रस्त्यावरील परिसरात सध्या वेश्याव्यवसायासह विविध अवैध धंदे सुरू असल्याचे गंभीर चित्र समोर येत आहे. या प्रकारांना आळा बसायला पाहिजे परंतु वास्तविकता या उलट आहे. या वेश्या व्यवसायाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अभय मिळत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. विशेष म्हणजे, तालुक्याचे श्रद्धास्थान असलेल्या रेणुका देवी डोंगर, मंठा यांच्या पायथ्याशी, तसेच शाळा–महाविद्यालये व मुलींच्या वस्तीगृहांच्या हाकेच्या अंतरावर हे गैरप्रकार सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.नागरिकांच्या म्हणण्यानुसार, उस्वद रस्त्यालगतच्या काही ठराविक ठिकाणी वेश्याव्यवसायासोबतच अमली पदार्थांची देवाणघेवाणही बिनधास्तपणे सुरू आहे. दिवसाढवळ्या तसेच रात्री उशिरापर्यंत संशयास्पद हालचाली होत असतानाही ठोस व सातत्यपूर्ण कारवाई होत नसल्याची तक्रार स्थानिकांकडून करण्यात येत आहे.रेणुका देवी हे मंठा तालुक्याचे दैवत असून परिसर धार्मिक व सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील मानला जातो. अशा पवित्र ठिकाणीच गैरप्रकार सुरू असणे ही अत्यंत गंभीर व लाजिरवाणी बाब असल्याचे नागरिकांचे मत आहे. शाळा–महाविद्यालये आणि मुलींच्या वस्तीगृहांच्या जवळ सुरू असलेल्या या प्रकारांमुळे विद्यार्थिनी, पालक व स्थानिक महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली आहे. काही पालकांनी मुलींच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करत तातडीने विशेष मोहीम राबवून अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. संबंधित यंत्रणांनी वेळीच लक्ष घालून परिसरातील सामाजिक व सांस्कृतिक वातावरण अबाधित राखावे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# अर्थसंकल्प सोप्या भाषेत : सर्वसामान्यांसाठी अर्थसंकल्पाचा सोपा मार्गदर्शक

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** येत्या ६ मार्च रोजी वर्ष २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठी राज्याचा अर्थसंकल्प विधानसभेत सादर होणार असून, तो सर्वसामान्यांना सहज समजावा यासाठी मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सहा वर्षांपूर्वी लिहिलेले "अर्थसंकल्प सोप्या भाषेत" हे पुस्तक पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.

४ मार्च २०२० रोजी नागपूर येथील लाखे प्रकाशनाने प्रकाशित केलेले हे पुस्तक अर्थसंकल्पाच्या गुंतागुंतीच्या संकल्पना सर्वसामान्य वाचकांसाठी सोप्या आणि सरळ भाषेत उलगडून सांगते. राज्याच्या आर्थिक धोरणांचा आराखडा असलेला अर्थसंकल्प कसा वाचावा, त्यातील तरतुदी कशा समजून घ्याव्यात आणि शासनाच्या खर्चाची दिशा कशी ओळखावी याचे मार्गदर्शन या पुस्तकातून करण्यात आले आहे.

अर्थसंकल्पाची संपूर्ण मांडणी

या पुस्तकात 'बजेट' शब्दाची उत्पत्ती, अर्थसंकल्प



समजून घेण्यासाठी आवश्यक मूलभूत बाबी, अर्थसंकल्पीय संज्ञांचे मराठी-इंग्रजी अर्थ, महत्त्वाच्या आर्थिक संकल्पना, भारतीय राज्यघटनेतील तरतुदी, अर्थसंकल्पाची रचना व तयार होण्याची प्रक्रिया यांचा सविस्तर ऊहापोह करण्यात आला आहे.

अर्थसंकल्पीय प्रकाशने, मंजुरीची प्रक्रिया, कायद्यात रुपांतर आणि राज्याच्या एकत्रित निधीतून खर्चास मिळणारी परवानगी या सर्व टप्प्यांचे सोपे स्पष्टीकरण पुस्तकात आढळते. विशेषतः 'व्हाईट बुक' (अंदाजपत्रक) आणि 'ग्रीन बुक'मधील तरतुदींचे विश्लेषण करून त्यातील आकडेवारीचा अर्थ सर्वसामान्यांना कसा समजून घ्यावा, यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

प्रादेशिक विकासावरही भर

राज्यघटनेच्या अनुच्छेद ३७१ (२) (ब) नुसार प्रादेशिक अनुशेष निर्मूलनासाठी राज्यपालांच्या निर्देशांनुसार सादर होणाऱ्या अनुपालन आदेशाची माहितीही पुस्तकात दिली आहे. विविध विभागनिहाय व विकास मंडळनिहाय अनिवार्य खर्चाची माहिती समजावून सांगत राज्याच्या आर्थिक प्राधान्यक्रमांची ओळख करून देण्यात आली आहे.

ऑनलाइन उपलब्धता

हे पुस्तक सर्वांसाठी संकेतस्थळावर विनामूल्य उपलब्ध असून अर्थसंकल्प समजून घेण्यासाठी ते उपयुक्त ठरत आहे. आगामी अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर हे पुस्तक नागरिक, विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा तयारी करणारे उमेदवार तसेच लोकप्रतिनिधी यांच्यासाठी मार्गदर्शक ठरणार आहे.

राज्याच्या आर्थिक धोरणांची दिशा समजून घेण्यासाठी आणि अर्थसंकल्पातील आकडेवारीचा अर्थ उलगडून पाहण्यासाठी "अर्थसंकल्प सोप्या भाषेत" हे पुस्तक सर्वसामान्यांसाठी एक विश्वासार्ह संदर्भग्रंथ ठरत आहे.

# गालसुरे गावची ग्रामदेवता आई जाकमातेच्या यात्रास्थानाचा जिर्णोद्धार सोहळा उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित** : गालसुरे गावची ग्रामदेवता आई जाकमाता यांच्या यात्रास्थानाचा जिर्णोद्धार समारंभ आज अत्यंत भक्तीमय वातावरणात आणि मोठ्या उत्साहात पार पडला. या पवित्र सोहळ्यानिमित्त जाकमातेची दिंडी स्थापित मंदिरापासून विधिवत काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात, जयघोषात आणि भक्तांच्या उपस्थितीत दिंडी यात्रास्थानावर पोहोचली व देवीची विधीपूर्वक स्थापना करण्यात आली.



जिर्णोद्धारानंतर प्रथमच पार पडलेल्या या सोहळ्यामुळे संपूर्ण गावात आनंद आणि समाधानाचे वातावरण होते. ग्रामस्थांच्या वतीने कीर्तन, भजन आणि पारंपरिक पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या धार्मिक कार्यक्रमांमुळे वातावरण पूर्णतः भक्तिमय झाले होते.

या सोहळ्यासाठी गालसुरे गावातील तसेच मुंबईत वास्तव्यास असलेल्या ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून आपल्या ग्रामदेवतेप्रती असलेली श्रद्धा व्यक्त केली. एकजुटीचे आणि परंपरेप्रती असलेल्या निष्ठेचे दर्शन या कार्यक्रमातून घडले.

दरवर्षी शिमगोत्सवात जाकमातेचे यात्रास्थानावर आगमन होते आणि तेथे विशेष पूजा, ओटी भरणे तसेच नवस फेडण्याचे विधी पार पाडले जातात. "नवसाला पावणारी देवी" अशी जाकमातेची महती ग्रामस्थांच्या वतीने सांगितली जाते.


जिर्णोद्धारानंतर नवचैतन्याने उजळलेल्या यात्रास्थानामुळे गावाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेला अधिक बळकटी मिळाली असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# नेरुळ येथे आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी/ गुरुनाथ तिरपणकर** : नेरुळ मधील सेक्टर २ येथे राजीव गांधी ब्रिजच्या जवळ साई जनसेवा प्रतिष्ठान व सिद्धिविनायक केअर सेंटर चे संचालक डॉ. रविंद्र गोसावी यांच्या संयुक्त विद्यमाने साई भंडाऱ्याच्या निमित्ताने दिनांक २८. २. २६ रोजी भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. सुमारे दोनशे गरजू नागरिकांनी त्याचा लाभ घेतला. तसेच महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या सफाई कामगार यांनीही या शिबिराचा लाभ घेतला.

शिबिराची सुरुवात साई प्रतिष्ठानचे अध्यक्ष रतन मांडवे, नवनिर्वाचित नगरसेवक अभिजीत देसाई, सिद्धिविनायक केअर

सेंटरचे संचालक डॉ. रविंद्र गोसावी, इंद्रधनुष्य अपार्टमेंटचे साई भक्त रमेश शिवतरकर तसेच श्री. चव्हाण व श्री. मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलन करुन करण्यात आली.


डॉक्टर गोसावी यांनी शिबिराचे आयोजन कल्पकतेने केले होते. नागरिकांना त्यांनी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या त्यात प्रामुख्याने साई दृष्टी आय हॉस्पिटल यांच्या तर्फे प्रदीप सर व त्यांच्या टीमने मोफत डोळे तपासणी केली व गरजूंसाठी नाममात्र दरात चष्म्यांचे वाटप करण्यात आले. मयुरेश हॉस्पिटल यांच्या मार्फत सर्व रुग्णांची मोफत रक्तदाब, शुगर व प्राथमिक तपासणी, ईसीजी तसेच फ्री कन्सल्टेशन देण्यात आले. तसेच रुग्णांसाठी माफक दरात अँजिओग्राफी व इतर वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. निओ डायग्नॉस्टिक सेंटर यांच्या तर्फे सर्व रुग्णांची मोफत CBC, कोलेस्टेरॉल व TSH तपासणी करण्यात आली.

समाजाच्या आरोग्य हितासाठी भविष्यातही असे उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती डॉ. रविंद्र गोसावी यांनी दिली.साई जनसेवा प्रतिष्ठानच्या वतीने सचिन धुमाळ तसेच सिद्धिविनायक केअर सेंटरच्या डायरेक्टर सौ. अनिता रविंद्र गोसावी यांनी शिबिराच्या शेवटी सर्व वैद्यकीय टीमचे आभार मानले.

# पनवेल येथे "मकबूल दुआ" पुस्तकाचे प्रकाशन संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इक्बाल काझी यांच्या हस्ते "मकबूल दुआ" या पुस्तकाचे प्रकाशन समारंभ उत्साहात पार पडला.या प्रसंगी हलीमाबाई झुलेवाली ट्रस्टचे अध्यक्ष हनीफ कच्ची यांच्यासह झुबेर पिट्टू, जव्वाद काझी, माझ मुल्ला, आसिफ कारेल, निसार पटेल, अझीम मुल्ला, नूर पटेल, यासर



आणि साजिद पटेल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी इक़बाल काझी यांनी आपल्या भाषणात हनीफ कच्छी यांच्या सामाजिक व राष्ट्रहिताच्या कार्याचे कौतुक केले. ते देश आणि समाजाच्या प्रगतीसाठी तसेच तरुण पिढीला चांगला व सद्गुणी नागरिक बनवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले. पुस्तके आणि दुआ यांच्या माध्यमातून समाजाला योग्य मार्गावर नेण्याचा हा स्तुत्य उपक्रम असल्याचेही त्यांनी नमूद केले. समारंभ आनंददायी वातावरणात संपन्न झाला असून उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत केले.

# दाभड येथील मॉर्निंग वॉक ग्रुपच्या वतीने धुलीवंदन उत्साहात साजरा

## गळयात होळीच्या गाठी बांधून रंगोत्सवात सहभागी

**दैनिक युवक आधार**

**दाभड, (तालुका प्रतिनिधी) -अरविंद पांचाळ** : दाभड येथील मॉर्निंग वॉक ग्रुपच्या वतीने धुलीवंदनाचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी गळयात होळीच्या गाठी बांधून एकमेकांना रंग लावत आनंदोत्सव साजरा केला.कार्यक्रमास दाभड येथील उपसरपंच अरविंद पांचाळ, बामणी येथील उपसरपंच लिंगोजी चिंतले, पोलीस पाटील दीपक दादजवार, संजय पाटील टेकाळे, राजू पाटील टेकाळे, ऑक्सफर्ड इंग्लिश मीडियम स्कूलचे प्राचार्य रवींद्र सूर्यवंशी, लोकमतचे तालुका प्रतिनिधी गोविंद टेकाळे, एम.आर. संतोष टेकाळे, व्यंकटराव शंकरराव



टेकाळे, सुभाष भुजंगराव टेकाळे, साईनाथ कल्याने, रिस्टार्ट संतोष दवे, गजानन दवे, राजू पाचंगे, संतोष कदम (बामणीकर), विष्णू दवे, संदीप हाळे, प्रशांत टेकाळे,

उत्तम टेकाळे, रामकिशन गिरी, बालाजी कवडे, शिवम हॉटेलचे मालक गोविंद कदम, गणेश तारडे, प्रकाश दादाजवार व कैलास राजेगोरे, आत्माराम राजेगोरे, साई स्वामी, आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी एकमेकांना रंग लावत, शुभेच्छा देत आणि आनंदमय वातावरणात धुलीवंदन साजरे केले. कार्यक्रमामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# आष्टीत रंगली 'विकासा'ची धुलवड

## पाण्यासाठी दोन माजी आमदार एकवटले आष्टी, पाटोदा,शिरूरच्या पाणी प्रश्नावर मंथन

## व्यापक जनआंदोलन उभारण्याचा नेत्यांचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी /मारुती सत्रे** : रंगांचा सण असलेल्या धुलीवंदनाच्या दिवशी आष्टी तालुक्यात मात्र एका वेगळ्याच'विकासाच्या धुलवडी'चा रंग पाहायला मिळाला. मतदार संघातील शाश्वत विकासाचा आणि प्रामुख्याने 'पाणी' या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी माजी आ.भीमराव धोंडे आणि माजी आ.बाळासाहेब आजबे या दोन नेत्यांनी एकत्र येत रणशिंग फुंकले आहे.या महत्त्वपूर्ण बैठकीने मतदार संघातील राजकीय समीकरणे बदलण्याची नांदी दिली असून,तिन्ही तालुक्यांतील कार्यकर्त्यांनी याला उत्स्फूर्त पाठिंबा दर्शवला आहे.आष्टी येथील भगवान महाविद्यालयात मंगळवारी दि.३ मार्च रोजी ही विशेष बैठक पार पडली. यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष दिपक घुमरे (पाटोदा), आष्टी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे,माजी जि.प.सदस्य रामराव खेडकर, पराग आप्पासाहेब राख,पाटोदा कृ.उ.बा.समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे,हनुमंत थोरवे,आरपी आयचे आष्टी तालुकाध्यक्ष अशोक साळवे, माजी सभापती नियामत बेग,माजी सभापती अनिल जायभाये,सतीश मामा झगडे,सरपंच दादा जगताप,माऊली वाघ,सुदाम काका झिंजूरके,हरिभाऊ जंजिरे,संजय विधाते,अंकुश मुंडे,संभाजी जगताप,बजरंग कर्डिले,नानाभाऊ वाडेकर,संजय



चंदनशिव,सोपान गाडे,आबासाहेब तावरे,आदिनाथ गवळी,भागवत वारे,बबन सांगळे,बाळासाहेब शेकडे,विकास वनवे,गणेश सांगळे,आदेश निमोनकर,सचिन नालकोल, निलेश सोनवणे,सय्यद शहाबुद्दीन,चंद्रशेखर साके,संजय नालकोल,महारुद्र खेडकर,धोंडीबा सांगळे,सूर्यभान सांगळे, दीपक बोराडे आदी मान्यवर व पाटोदा,शिरूर तालुक्यातील शेतकरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या दुष्काळी पट्ट्यातील शेतकऱ्यांचा वनवास कायमचा संपवण्यासाठी पाणी कसे उपलब्ध होईल यावर दोन्ही नेत्यांनी सविस्तर आणि अभ्यासपूर्ण मंथन केले.

**हार्वेस्टरमुळे बेकारी वाढेल,सिंचन हाच पर्याय - माजी आ.भीमराव धोंडे**

यावेळी बोलताना माजी आ.भीमराव धोंडे यांनी भविष्यातील संकटावर बोट ठेवले.ते म्हणाले,बीड हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा आहे. भविष्यात ऊसतोडीसाठी हार्वेस्टरचा वापर वाढल्यास या मजुरांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळेल. मुळातच पर्जन्यमान कमी असल्याने आपले तालुके दुष्काळी म्हणून गणले जातात.त्यामुळे येथे सिंचनाच्या सुविधा निर्माण करून पाणी आणणे ही काळाची गरज आहे. यासाठी सर्व मंत्र्यांची भेट घेणार असल्याचे सांगतानाच,न भूतो न भविष्यती अशी लोकचळवळ उभारू आणि जनसामान्यांच्या रेट्यामुळे आपला हा विषय अंतिम टप्प्यात यशस्वी करू असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देतील, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

**शेतकऱ्यांच्या शाश्वत पाणी योजनेवर व्यापक चर्चा!**

**आष्टी,पाटोदा,शिरूर हे तालुके सिंचनाच्या बाबतीत अत्यंत मागे आहेत. भविष्यातील यांत्रिकीकरणा मुळे (हार्वेस्टर) ऊसतोड कामगारांसमोर रोजगाराचे मोठे संकट उभे राहू शकते.या पार्श्वभूमीवर,विविध मार्गांनी या दुष्काळी पट्ट्यात पाणी आणणे क्रमप्राप्त आहे.यासाठी लवकरच मंत्रिमंडळाशी चर्चा करून जनहिताच्या या विकास योजनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी शेवटपर्यंत लढा देण्याचा निर्धार माजी आ.भीमराव धोंडे आणि बाळासाहेब आजबे यांनी या बैठकीत व्यक्त केला.**

**सत्तेत असलो तरी प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरू --माजी आ.बाळासाहेब आजबे**

माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी या प्रश्नावर तांत्रिक आणि अभ्यासपूर्ण मांडणी केली.जायकवाडी धरणातून काही भागाला पाणी मिळणे,खुंटेफळ प्रकल्पाचे ४ टीएमसी पाणी आणि सीना प्रकल्पाच्या आवर्तनातून पाणी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे असे माजी आ.आजबे म्हणाले. प्रशासकीय पातळीवर योग्य पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत.सत्तेत असलो तरी जनहिताच्या आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची आपली पूर्ण तयारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.राजकीय समीकरणे बदलणार ? एरवी राजकीय आखाड्यात वेगळ्या भूमिका घेणारे हे दोन बडे नेते मतदारसंघाच्या हितासाठी एकत्र आल्याने कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.या एकाधिकारशाही मोडून काढणाऱ्या ऐतिहासिक निर्णयामुळे भविष्यातील राजकीय आणि सामाजिक समीकरणे बदलतील असा अंदाज राजकीय विश्लेषकांकडून वर्तवला जात आहे. बैठकीच्या शेवटी दोन्ही नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी एकमेकांना रंग लावून खऱ्या अर्थाने विकासाचे धुलीवंदन साजरे केले.

# महाराजस्व समाधान शिबिर' महागावात; नागरिकांनी लाभ घ्यावा – उपविभागीय अधिकारी राम मुळे यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे/महागाव : यवतमाळ** : 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर – टप्पा १' या विशेष अभियानांतर्गत महागाव तालुक्यात मंडळनिहाय शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. महसूल व विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देत प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी राम मुळे यांनी केले आहे.

या शिबिरामध्ये प्रलंबित फेरफार प्रकरणे, ७/१२ व ८-अ मधील त्रुटी दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे उतारे, उत्पन्न, रहिवासी व जात प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेयर दाखले तसेच विद्यार्थ्यांसाठी विविध दाखले देण्यात येणार आहेत. जमीन अभिलेख अद्ययावत करणे, अकृषिक (NA) प्रकरणांबाबत मार्गदर्शन, नवीन व्यवस्थापन सनद प्रक्रियेची माहिती, तुकडबंदी उल्लंघन प्रकरणांचा निपटारा, भूसंपादन व अकृषिक




परवानगीसंदर्भातील 'कमी-जास्त पत्रके' तयार करून गाव दप्तर अद्ययावत करण्याची कार्यवाही शिबिरात केली जाणार आहे.

तसेच सामाजिक अर्थसहाय्य प्रकरणे, विविध शासकीय योजनांची मंजुरी, घरांसाठी पट्टे वाटप, ई-पीक नोंदणी आणि पी.एम. किसान नोंदणी आदी सेवा देखील उपलब्ध राहणार आहेत. नगर परिषद, पंचायत समिती, आरोग्य व इतर विभागांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असल्याने नागरिकांची प्रशासकीय कामांसाठी होणारी धावपळ कमी होणार आहे.

महागाव तालुक्यातील शिबिरांचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आले आहे : ७ मार्च २०२६ – हिवरा, १४ मार्च २०२६ – काठी (दो.), १ एप्रिल २०२६ – कासोळा, १० एप्रिल २०२६ – गुंज, १७ एप्रिल २०२६ – मोरथ, ८ मे २०२६ – फुलसावंगी आणि १५ मे २०२६ – महागाव.

उपविभागीय अधिकारी राम मुळे यांनी नागरिकांना आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून प्रलंबित कामांचा तातडीने निपटारा करून घ्यावा, असे आवाहन केले आहे. तर तहसीलदार अभय मस्के यांनी ही योजना तळागाळातील शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यावर प्रशासनाचा भर असल्याची माहिती दिली. या उपक्रमामुळे महसूल सेवा अधिक पारदर्शक, गतिमान व नागरिकाभिमुख होणार असल्याचा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# भेलने दोन्ही नियोजित प्रकल्प सुरू केल्यास MIDC लिझ परत देणार; 31 मार्चपर्यंत अंतिम मुदत

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले/ लाखनी भंडारा :** मागील १३ वर्षांपासून रखडलेला भेल प्रकल्प आता निर्णायक टप्प्यात पोहोचला असून, प्रकल्प सुरू करण्याबाबत हालचालींना वेग आला आहे. Bharat Heavy Electricals Limited (भेल) ने आपले नियोजित दोन्ही प्रकल्प प्रत्यक्षात सुरू केल्यास Maharashtra Industrial Development Corporation (MIDC) पुन्हा लिझ प्रदान करण्यास तयार असल्याचे स्पष्ट केले आहे.

भेल संदर्भात निर्णय घ्यावा या मागणीसाठी विजय नवखरे यांच्या नेतृत्वाखालील संघटनेने मा. मुख्यमंत्री यांना आत्मदहनाचा इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री सचिवालयाकडून MIDC प्रशासनाला तातडीने पत्रव्यवहार करण्यात आला. त्याला उत्तर देताना MIDC ने स्पष्ट केले की, भेलने आपले दोन्ही नियोजित प्रकल्प सुरू करण्याबाबत ठोस पावले उचलल्यास लिझ पुनर्प्रदान करण्यात येईल. तसेच प्रकल्पाचा सविस्तर अहवाल त्वरित सादर करण्याचे निर्देशही भेल प्रशासनाला देण्यात आले आहेत.



संघटनेच्या इशाऱ्यानंतर प्रकरणाला गती मिळाली असली तरी, भेलकडून कोणतीही हलगर्जीपणा झाल्यास त्यास संपूर्णपणे भेल प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा देण्यात आला आहे. जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनीही यात सक्रिय हस्तक्षेप करून प्रकल्प सुरू होण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी संघटनेकडून करण्यात आली आहे.

दरम्यान, काही माजी लोकप्रतिनिधी जाणूनबुजून हा प्रकल्प पूर्णत्वास जाऊ नये यासाठी प्रयत्न करत असल्याचा आरोपही संघटनेने केला आहे. मात्र, यापुढे असा कोणताही अडथळा सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

भेल संघटनेचे अध्यक्ष विजय नवखरे यांनी 31 मार्चपर्यंतची अंतिम मुदत जाहीर केली आहे. यापूर्वीही अनेक आंदोलने, मोर्चे काढण्यात आले असले तरी भेल प्रशासन केवळ आश्वासने देत वेळ काढत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**31 मार्चनंतर उग्र आंदोलनाचा इशारा**

निर्धारित मुदतीपर्यंत प्रकल्पाबाबत ठोस निर्णय न झाल्यास प्रकल्पस्थळी उग्र आंदोलन छेडण्यात येईल. या दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी भेल प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा संघटनेचे अध्यक्ष विजय नवखरे यांनी दिला आहे.

मुख्यमंत्री सचिवालयाकडूनही भेलने त्वरित प्रकल्प अहवाल MIDC ला सादर करावा, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे. आता 31 मार्चपर्यंत भेल प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# रेवदंडा बहिरी गल्लीत शिमगोत्सवाचा रंगबिरंगी जल्लोष!

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा :** रेवदंडा गावातील कोकण मातीतला उत्साह, परंपरा आणि संस्कृतीचा अभिमान पुन्हा एकदा जोर धरला. सुमारे ३५० वर्षे जुनी ही होळी परंपरा काही वर्षांपूर्वी विकृत बुद्धीच्या काही लोकांच्या बंदी प्रयत्नांना देवांनी चांगलीच अद्दल घडवली. आता मात्र रेवदंडा बहिरी गल्लीतील शिमगोत्सव ढोल-ताश्याच्या गजबजाती जल्लोशात साजरा होतोय.



"उत्सवाची भव्य सुरुवात"

फाल्गुन पौर्णिमेला होळी जाळून हा सोहळा सुरू झाला. गावकऱ्यांनी सुकी लाकडे, गोळ्या गोळा करून चौकात केळी-सुपारी उभी करत होळी पेटवली. पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण करून सर्वजण पूजा करत "होळी रे होळी पुरणाची पोळी" असं गात नाचले. जुन्या कटुता जाळून नवचैतन्याचा संदेश देणारा हा उत्सव कोकणातील लोकपरंपरेचं जिवंत प्रतीक ठरला.

"वाजत गाजत रंगणारा मिरवणूक मेळा "

सर्वत्र होळीचा वाजत गाजत गावकऱ्यांसह तरुण, महिलांबरोबर ज्येष्ठांचा सहभाग असलेली उत्सव गावभर होत असतो . रेवदंडा बहिरी गल्ली होळीचा नवस पावणाऱ्यांनीही अनुभव सांगितले. "होळीला गवऱ्या पाच-पाच, डोक्यावर नाच-नाच" असं गाणं गात गोळा केलेल्या लाकडांनी उत्सवाची रंगत वाढवली. धुळिवडेला रंग-गुलाळ उधळून बंधुभावाचा हा सोहळा अधिकच रंगला.

"रेवदंडा बहिरी गल्ली अभिमान, जबाबदारीची ठरावणूक"

रेवदंड्याची सांस्कृतिक ओळख जपणं ही आपली सर्वांची जबाबदारी," असं जितेंद्र पाटील, गणेश घरत, विनोद नाईक, संदीप पाटील, सचिन पवार, बाबू पाटील, हुपेंद्र पाटील, प्रल्हाद घरत, अनुज पाटील, सई पाटील, राजू राणे यांनी सांगितलं. कोकण शिमगोत्सव केवळ सण नसून पूर्वजांची श्रद्धा-एकात्मतेचा महोत्सव असल्याचं ते म्हणाले. या उत्सवाने गावाला नवं संनादन मिळालं.


# श्रध्देची ताकद; कोटगावामध्ये 'पवित्र दगड' उचलून पूर्ण केली जाते होळीची प्रदक्षिणा!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** कोट गावाचे प्रत्येक सण म्हणजे संपूर्ण गावकऱ्यांच्या अस्मितेचा ,श्रद्धेचा सोहळा असतो. कोटगावची होळी म्हणजे परंपरा संस्कृती आणि गावाची एकजूट, आणि केवळ सणच नाही तर ' एक गाव एक होळी या संकल्पनेतून गावची एकजूट तर दिसतेच पण जेव्हा होळीची पहिली ठिणगी पडते तेव्हा प्रत्येक कोटगावकरी हृदयाने आपल्या ग्रामदेवतेचे चरणी नतमस्तक होतो. ही होळी म्हणजे दुष्ट प्रवृत्तींचा नाश आणि सात्विकतेचा विजय मानली जाते.

कोटगाव चे ग्रामदैवत श्री राघोबा देव हे परिसरातील अत्यंत जागृत आणि नवसाला पावणारे दैवत म्हणून ओळखले जाते. श्री राघोबा देव हे केवळ मंदिर नसून संपूर्ण गावाचे जागृत शक्तीपीठ आहे लहान मुलांपासून ते थोरा मोठ्यांपर्यंत सर्वांच्याच मनात या दैवताबद्दल नितांत श्रद्धा आहे.श्री राघोबा देव म्हणजे संकटात धावून येणारा आधार ,आणि गावाचा रक्षणकर्ता या श्रद्धेपोटी होळी प्रज्वलीत झाल्यानंतर देवाचा पवित्र दगड उचलून फेऱ्या मारण्याच्या प्रथा आजही तितक्याच भक्तीने जोपासली जात आहे. हा दगड उचलणे म्हणजे केवळ शारीरिक कसरत नसून ती देवाप्रती असलेली आपली भक्ती आणि निष्ठा सिद्ध करण्याची एक परीक्षा असते. तसेच दगड उचलणे म्हणजे श्री राघोबा देवाचा आशीर्वाद मिळवणे ,अशी गावकऱ्यांची धारणा आहे. म्हणून तर पन्नासाव्या वर्षीही मंगेश पाटील यांनी सहा फेऱ्या मारल्या तर अभिषेक भोईर यांनी दहा फेऱ्यांचा टप्पा गाठला ही शक्ती केवळ माणसाची नसून जागृत देवस्थानाच्या आशीर्वादाची प्रचिती आहे .अशी अनेक वर्षांपासून ची परंपरा अखंड सुरू असून कोटगावच्या मातीने हा सांस्कृतिक वारसा आजही जपून ठेवला आहे.

यावेळी दोन गटातील स्पर्धा रंगली यात वयाचे बंधन विसरून स्पर्धकांनी श्री



राघोबा देवाच्या नावाने दगड उचलला चाळीस वर्षावरील वयोगटात मंगेश पाटील वय वर्ष ५० यांनी आपल्या आत्मविश्वासाच्या जोरावर सहा फेऱ्या पूर्ण करत प्रथम क्रमांक पटकावला. पन्नाशीतही त्यांनी दाखवलेली ही ऊर्जा तरुणांसाठी प्रेरणादायी ठरली. तर युवा गटात मोठी चुरस पाहायला मिळाली अभिषेक भोईर यांनी विक्रमी १० फेऱ्या मारून प्रथम क्रमांक पटकावला तर तेजस भोईर यांनी पाच फेऱ्यांवरून द्वितीय क्रमांक पटकावला.

विजेत्या स्पर्धकांना कोटगाव ग्राम सुधारणा मंडळाचे अध्यक्ष यांच्यावतीने प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांकाची पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. धगधगती होळी "श्री हराघोबा देवा की जय" हा जयघोष आणि अंगावर शहारे आणणारे दगड उचलण्याचे दृश्य पाहून उपस्थित प्रेक्षक भारावून गेले होते. कोटगावची युवाशक्ती आपल्या ग्रामदेवतेच्या चरणी लीन होऊन जतन केलेली ही परंपरा म्हणजे भक्ती तिथे शक्तीचे जिवंत उदाहरण ठरले. आहे भक्तीचा अखंड झरा आणि पूर्वजांचा हा वारसा पुढील अनेक पिढ्यांतअसाच तेवत राहील यात शंका नाही. विज्ञानाच्या युगातही आपली जुनी परंपरा आणि रीतीरीवाज तितक्याच पवित्र भावनेने जपणारे कोट गाव संपूर्ण तालुक्यात चर्चेचा विषय ठरत आहे.

# उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनात महिला सुरक्षिततेवर उच्चस्तरीय बैठक

## सेफ्टी ऑडिट अहवालाचा आढावा; पॅनिक बटण व्हॉट्सअ‍ॅपशी जोडण्याचे व स्कूल बस शाळेच्या आवारातच उभ्या करण्याचे दिले निर्देश

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महिलांच्या सुरक्षिततेसंदर्भात करण्यात आलेल्या राज्यव्यापी सेफ्टी ऑडिटचा आढावा घेण्यासाठी विधानभवनात उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक पार पडली. बदलापूर येथील अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराची घटना आणि स्वारगेट बसस्थानकावरील प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर ही बैठक आयोजित करण्यात आली. स्वयंसेवी संस्थांमार्फत राज्यातील २४२ ठिकाणी करण्यात आलेल्या सेफ्टी ऑडिटमधील शिफारशी तातडीने आणि निश्चित कालमर्यादेत अंमलात आणाव्यात, असे स्पष्ट निर्देश डॉ. गोऱ्हे यांनी प्रशासनाला दिले.

अहवालात बसस्थानके, रेल्वे स्थानके व सार्वजनिक वाहतुकीशी संबंधित ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून सीसीटीव्ही, प्रकाशव्यवस्था, महिला पोलिसांची गस्त, हेल्पलाईन, पॅनिक बटण, स्वच्छतागृहे, तक्रार नोंदणी प्रणाली आणि 'हिरकणी कक्ष' यांची स्थिती तपासण्यात आली. अनेक सुविधा अस्तित्वात असूनही त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले. विशेषतः पॅनिक बटण प्रणाली कार्यक्षम नसल्याचे आढळल्याने ती नियंत्रण कक्षाशी तसेच व्हॉट्सअ‍ॅप क्रमांकाशी थेट जोडण्याचे निर्देश देण्यात आले, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत महिलांना त्वरित मदत मिळेल.

डॉ. गोऱ्हे यांनी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देत शालेय बस चालक व कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देणे, बसस्थानकांवर सीसीटीव्ही संदर्भातील स्पष्ट फलक लावणे, पॅनिक बटणाविषयी जनजागृती वाढवणे आणि शाळांनी बस शाळेच्या आवारातच उभ्या करण्याची



व्यवस्था करणे आवश्यक असल्याचे सांगितले. पीडित मुलींना शासकीय योजनांचा लाभ मिळतोय का याची पडताळणी करून आवश्यकतेनुसार समुपदेशनाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, असेही त्यांनी नमूद केले.असंघटित क्षेत्रातील महिला कामगारांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र उपाययोजना आखून त्यांच्या नोंदीसाठी विशेष ॲप विकसित करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. तसेच वन स्टॉप क्रायसिस सेंटरचा नियमित आढावा घेऊन प्रत्यक्ष लाभार्थींना मदत मिळते का याचे मूल्यमापन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

परिवहन विभागाने ६३३ ठिकाणी सीसीटीव्ही बसविल्याची माहिती दिली असून प्रत्येक बसस्थानकावर सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आल्याचे सांगितले. शालेय बसमध्ये महिला सहाय्यक नेमणे बंधनकारक करण्यात आले असून लवकरच सर्व बसमध्ये सीसीटीव्ही, जीपीएस आणि पॅनिक बटण प्रणाली अनिवार्य करून ती पोलीस विभागाशी जोडण्यात येणार आहे. पोलीस विभागाने शाळा सुटण्याच्या वेळेत गस्त वाढवली असून प्रत्येक पोलीस चौकीत 'भरोसा सेल' कार्यरत असल्याचे स्पष्ट केले.बैठकीस अपर पोलीस महासंचालक अश्वती दोर्जे, परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, उपसचिव (शालेय शिक्षण) तुषार महाजन, कामगार कल्याण आयुक्त भास्कर मोराडे, उपायुक्त (महिला व बाल कल्याण) राहुल मोरे तसेच एस.टी. महामंडळाचे सुरक्षा व दक्षता अधिकारी श्री. तिकोटकर , शारदा साठे ,स्त्री मुक्ती परिषद आदी उपस्थित होते.स्त्री मुक्ती परिषद व स्त्री आधार केंद्राने सेफ्टी ऑडिट म्हणजेच महिला सुरक्षेचा लेखाजोखा यांवर १० फेब्रुवारी २६ रोजी शिष्टमंडळ भेटुन कार्यवाहीची विनंती केली होती . बैठकीच्या शेवटी प्रत्येक बसस्थानकावर महिला कर्मचाऱ्यांची नेमणूक करून स्वतंत्र मदत केंद्र सुरू करण्याचे, रेल्वे व एसटीसाठी स्वतंत्र दक्षता समित्या स्थापन करण्याचे आणि स्वच्छतागृह व 'हिरकणी कक्ष' यांची नियमित तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले.

उपसभापती कार्यालयामार्फत स्वतंत्र महिला सुरक्षा समिती स्थापन करून सेफ्टी ऑडिटमधील सर्व शिफारशींची टप्प्याटप्प्याने काटेकोर अंमलबजावणी केली जाईल, असे डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केले.

# समाजसुधारणेचे दीपस्तंभः डॉ. संतुजी रामजी लाड यांच्या कार्याला विनम्र अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे :** हिंदू खाटीक समाजाचे भूषण आणि थोर समाजसुधारक डॉ.संतुजी रामजी लाड यांच्या जयंतीनिमित्त आज विविध ठिकाणी अभिवादन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आयुष्यभर कार्य करणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वाच्या स्मृतीस यावेळी कोटी कोटी प्रणाम करण्यात आले. दि.०४ मार्च १८४१ रोजी जन्मलेल्या डॉ. लाड यांनी शिक्षण, सामाजिक जागृती आणि संघटन या माध्यमातून हिंदू खाटीक समाजामध्ये




नवी चेतना निर्माण केली. सामाजिक समता, शिक्षणाचा प्रसार आणि स्वाभिमानाची जपणूक यासाठी त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी मानले जाते.त्यांच्या कार्यामुळे समाजात शिक्षणाची गोडी निर्माण झाली आणि अनेक तरुणांनी प्रगतीची नवी दिशा स्वीकारली.समाजातील अन्याय, अंधश्रद्धा आणि मागासलेपण दूर करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. दि.८ऑक्टोबर १९९६ रोजी त्यांचे निधन झाले असले तरी त्यांचे विचार आणि कार्य आजही समाजासाठी दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरत आहेत.

यावेळीवसंत राठोड,मा. सरपंच,प्रदिप राठोड,शरद मडवे, सुमित पवार, गणेश मडवे, फकिरा कल्लाणकर,मा. सरपचं, अमोल कल्लाणकर,खाटीक समाजाचे जिल्हाध्यक्ष, पांडुरंग मंडवे,पुसे सर मुख्याध्यापक,कोळी सर,सोनार मॅडम, पवार मॅडम,जाधव सर,दामोदर सर,इंगळे सर,समाजातील मान्यवरांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व त्यांच्या विचारांनुसार समाजाच्या प्रगतीसाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# तळा महसूल विभागाकडून कुडे येथे महाराजस्व समाधान शिबिराची जनजागृती

## तालुक्यातील नागरिकांनी शिबिरांचा लाभ घ्यावा - तळा तहसीलदार श्रीमती.स्वाती पाटील

**दैनिक युवक आधार**

**तळा / नितीन लोखंडे :** ग्रामीण भागातील नागरिकांना, विद्यार्थ्यांना, शेतकऱ्यांना, महसूल विभागाशी संबंधित असणाऱ्या प्रमाणपत्रांचे दाखल्यांचे निराकरण करण्याकरिता तसेच त्यांच्या तक्रारी निकाली काढण्यासाठी शासन निर्णयानुसार तळा तहसीलदार श्रीमती. स्वाती पाटील यांनी तालुक्यामध्ये मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन केले आहे. महसूल प्रशासन अधिक गतिमान आणि लोकाभिमुख व्हावे हा या शिबिराचा हेतू आहे. 18 फेब्रुवारीपासून ते 5 मार्च 2026 या कालावधीमध्ये महाराजस्व समाधान शिबिराची महसूल



विभागाकडून जनजागृती करून पूर्वतयारी करण्यात येत आहे. प्रत्यक्ष शिबिराची सुरुवात ही सात मार्चपासून करण्यात येणार आहे. या विशेष मोहिमेद्वारे शेतकऱ्यांना, नागरिकांना, विद्यार्थ्यांना, एकाच ठिकाणी सर्व सेवा उपलब्ध करून जनजागृती करण्यावर भर दिला जाणार आहे. या शिबिरांमध्ये जातीचे दाखले, वय व अधिवास दाखला, उत्पन्नाचे दाखले, प्रलंबित फेरफार निकाली काढणे, रेशन कार्ड संबंधित कामे, संजय गांधी निराधार योजनेचे फॉर्म भरणे, सातबारा तसेच फेरफार संबंधित कामे, वारस नोंदी, भोगवटदार वर्ग २ ची जमीन भोगवटदार वर्ग १ मध्ये रूपांतर करणे, ज्येष्ठ नागरिक दाखले, अठरा वर्षे पूर्ण झालेल्या नवीन मतदारांचे नवीन मतदान ओळखपत्र बनविण्याकामी फॉर्म भरून घेणे, इत्यादी सेवा नागरिकांना दिल्या जाणार आहेत.

# सप्लाय चेन कॉन्क्लेव्ह 2026 भारती विद्यापीठ, नवी मुंबई येथे संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई, वार्ताहर :** भारती विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), नवी मुंबई येथील व्यवस्थापन अध्ययन विभागाने खारघर कॅम्पसमध्ये असोसिएशन ऑफ सप्लाय चेन प्रोफेशनल्स (ASCP) यांच्या विशेष सहकार्याने सप्लाय चेन कॉन्क्लेव्ह 2026 चे आयोजन केले.

या कॉन्क्लेव्हचे उद्घाटन MACCIA चे अध्यक्ष मा. श्री. रवींद्र मंगावे यांनी प्रमुख मान्यवर म्हणून केले. त्यांनी भारताच्या सप्लाय



चेन परिसंस्थेला बळकटी देण्यासाठी उद्योग–शैक्षणिक सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले.

NMIA चे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. प्रभात महापात्रा यांनी प्रमुख पाहुणे व कीनोट वक्ते म्हणून उपस्थिती लावली. त्यांनी नवी मुंबईची भारताच्या सप्लाय चेन भविष्यातील प्रवेशद्वार म्हणून वाढती भूमिका अधोरेखित केली.हा कॉन्क्लेव्ह डॉ. प्रेमसिश रॉय, अधिष्ठाता – व्यवस्थापन अध्ययन संकाय व संचालक – व्यवस्थापन अध्ययन विभाग, तसेच डॉ. मोना सिन्हा, विभागप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. कॉन्क्लेव्हचे संयोजक प्रा. रिखी यादव, अध्यक्ष – कॉर्पोरेट रिसोर्स सेल होते.

या कॉन्क्लेव्हमध्ये नामांकित उद्योग क्षेत्रातील वक्त्यांची व्याख्याने, संवादात्मक चर्चासत्रे आणि प्रश्नोत्तर सत्रांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला आणि उद्योग व शिक्षण क्षेत्र यांना जोडणारा प्रभावी नेटवर्किंग मंच ठरला.

# नेक्स्ट-जनरेशनसाठी यूपीआय प्रोसेसिंग प्लॅटफॉर्म सुविधा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** नेक्स्ट-जेन यूपीआय प्रोसेसिंग प्लॅटफॉर्मवर आपले डिजिटल बँकिंग चॅनेल आता लाइव्ह असल्याची घोषणा आज इंडसइंड बँकेने केली. भारताच्या रिअल-टाइम पेमेंट इकोसिस्टममध्ये ही एक परिवर्तनकारी झेप आहे. हा नवीन प्लॅटफॉर्म प्रगत गती, स्केलेबिलिटी आणि विश्वासार्हता एकत्रित करून डिजिटल बँकिंगमध्ये एक नवीन बेंचमार्क स्थापित करते जेणेकरून बँकेच्या लाखो ग्राहकांना तसेच देशभरातील व्यापाऱ्यांना अखंड आणि




उत्तम पेमेंट अनुभव मिळतील.


युपीआय ६.० हा प्लॅटफॉर्म माइंडगेट सोल्युशन्सचे सहावे अपग्रेड आहे, जे हायपर-स्केलेबल, क्लाउड-रेडी आणि रेझिलिंट आर्किटेक्चरवर आधारित आहे, जे अत्याधुनिक रिअल-टाइम पेमेंट स्टॅक देते. इंडसइंड बँक ही इश्युअर आणि अक्वायर या दोन्ही सेवांसाठी नेक्स्ट जनरेशन प्रक्रिया प्लॅटफॉर्मचा वापर करणारी पहिली खासगी बँक आहे. हे अपग्रेड ३० टक्के जलद पुनर्प्राप्ती वेळ प्रदान करते आणि सध्याच्या पायाभूत सुविधांसह ७५ टक्केपर्यंत उच्च स्केलेबिलिटी हेडरूम प्रदान करते. नेक्स्ट जनरेशन युपीआय प्रोसेसिंग प्लॅटफॉर्मची रचना दुसऱ्या पिढीतील प्रतिसाद वेळ, जवळजवळ शून्य तांत्रिक अडचणी आणि काही मिनिटांतच अडथळ्यांवर मात करण्यासाठी केली गेली आहे. "ग्राहकांना उत्तम अनुभव देणे हा आमचा डिजिटल-फर्स्ट दृष्टिकोन आहे," असे इंडसइंड बँकेचे मुख्य माहिती अधिकारी रवी पांगल म्हणाले. "नेक्स्ट जनरेशनसाठीचा युपीआय प्रोसेसिंग प्लॅटफॉर्म हा प्रत्येक व्यवहारात गती, लवचिकता आणि विश्वास प्रदान करण्याच्या आमच्या वचनबद्धतेतील पुढचे पाऊल आहे. व्यक्ती, व्यापारी आणि उद्योगांना रिअल टाइममध्ये सेवा देणारी भविष्यासाठी तयार, बुद्धिमान बँकिंग परिसंस्था तयार करण्याच्या आमच्या डिजिटल धोरणाशी हा टप्पा सुसंगत आहे."

# 'शिवा' फेम 'या' अभिनेत्रीची 'सावळ्याची जणू सावली'मध्ये एन्ट्री

तुम्हाला 'शिवा' मालिका आठवतेय? झी मराठी वाहिनीवर ही मालिका प्रदर्शित झाली होती. फेब्रुवारी २०२४ मध्ये ही मालिका प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. मालिकेने ऑगस्ट २०२५ मध्ये निरोप घेतला. मालिकेतील शिवा, आशू, कीर्ती, दिव्या, रामभाऊ, बाईआजी ही आणि अशी सगळीच पात्रे गाजली.

शिवाने तिच्या अनोख्या स्टाईलने प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. मात्र, आता या मालिकेची का चर्चा होत आहे, असा प्रश्न तुम्हाला पडला आहे का? तर या मालिकेतील एका अभिनेत्रीची झी मराठीच्या सावळ्याची जणू सावली मालिकेत एन्ट्री झाली आहे. आता ही अभिनेत्री नेमकी कोण, हे जाणून घेऊ...

सावळ्याची जणू सावली या मालिकेत दररोज नवीन ट्विस्ट येताना दिसतात. सावली आणि भैरवी सतत एकमेकींना आव्हान देतात. भैरवी ही सावली व मेहेंदळे कुटुंबाला त्रास देण्यासाठी त्यांच्या घरात आली आहे. ती सावलीविरुद्ध कारस्थान करते. कधी सावलीला त्याचा त्रास होतो; तर कधी सावली भैरवीच्या कारस्थानांना सामोरी जाते आणि तिला धडा शिकवते.



**"मी तुझंही दहन करणार..."**

आता सावळ्याची जणू सावली मालिकेचा एक प्रोमो प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या प्रोमोमध्ये पाहायला मिळते की, मेहेंदळे कुटुंब होळी साजरी करत आहे. भैरवीदेखील तिथे आहे. सावली, तारा आणि घरातील इतर मंडळी होळीभोवती प्रदक्षिणा घालत आहेत. त्यावेळी भैरवी मनातल्या मनात सावलीकडे बघत म्हणते, "या होलिकादहनाबरोबर मी तुझंही दहन करणार", असे म्हणत ती सावलीला धक्का देते. सावलीचा धक्का तिच्या पुढे असलेल्या ताराला लागतो. ताराला अग्नीचे चटके बसतात; पण सावली तिला सावरते.

प्रोमोमध्ये पुढे पाहायला मिळते की, सावली भैरवीला म्हणते, "माझा जीव गेला असता." त्यावर भैरवी म्हणते, "एक दिवस तुला आणि तुझ्या घराला असंच होळीच्या आगीत जाळेन." त्यावर सावली म्हणते, "माझ्या घरच्यांना काही करण्यापूर्वी तुम्हाला मला पार करावे लागेल." त्यावर भैरवी तिला म्हणते, "बघूया, भैरवी वझेपासून तुझ्या घराला कशी वाचवतेस?", असे म्हणत ती तिच्या हातातील कलश फेकून देते. तो कलश एका मुलीच्या पायाशी पडतो. ती मुलगी भैरवीला, भैरवीमाई... अशी हाक मारते. त्यानंतर भैरवी व सावली तिच्याकडे बघतात.

आता भैरवीला हाक मारणारी ही मुलगी म्हणजे अभिनेत्री मानसी सुरेश आहे. शिवा मालिकेत तिने कीर्ती ही भूमिका साकारली होती. शिवाला सतत त्रास देणारी, स्वार्थी व्यक्ती, अशी तिची भूमिका होती. आता सावळ्याची जणू सावली या मालिकेत तिचे पात्र नेमके कसे असेल, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.